रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २७२
www.ramprahar.com

◆ मंगळवार, २१ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## सरकारकडून शेतजमिनीच्या वाटणीवरील नोंदणी फी रद्द



**मुंबई :** राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देत राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाकडून सोमवारी जारी करण्यात आले आहे. आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ददेवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत वारसा हक्क प्राप्त झालेल्या सर्व सहधारकांनी एकत्र येऊन थेट नोंदणी कार्यालयात सादर केलेल्या वाटणीपत्रालाही आता नोंदणी शुल्कातून सूट मिळेल.

## अंतरंग


खालापूर पोलिसांनी दोन बालविवाह रोखले/२
पनवेल रेल्वेस्थानकात लिफ्ट कोसळली/३
मोहोपाडा येथे जिल्हास्तरीय खुली तायक्वांदो स्पर्धा/८


# विरोधकांकडून नारीशक्तीचा अपमान -मुख्यमंत्री

### महायुतीतर्फे राज्यव्यापी आंदोलन छेडण्याची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

संसदेत महिला आरक्षण विधेयकाच्या विरोधात मतदान करून विरोधकांनी देशातील नारीशक्तीचा अपमान केला असून, या मानसिकतेचा 'बुरखा' फाडण्यासाठी महायुतीतर्फे राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केली. १७ एप्रिल रोजी संसदेत जे घडले, तो देशाच्या इतिहासातील काळा दिवस असून महिलांच्या हक्कांची भ्रूणहत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना जनता कदापि माफ करणार नाही, अशा तिखट शब्दांत मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस आणि मित्रपक्षांवर हल्ला चढवला.

मुंबईत आयोजित एका विशेष पत्रकार परिषदेत फडणवीस बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री पंकजा मुंडे, आदिती तटकरे, मेघना बोर्डीकर, चित्रा वाघ, खा. ज्योती वाघमारे यांच्यासह महायुतीतील महिला नेत्यांची उपस्थिती होती. २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक जनगणना आणि परिसीमनानंतर लागू होईल, हे मान्य करणाऱ्या विरोधकांनी आता सरकारकडे दोन-तृतीयांश बहुमत नसल्याचे पाहून सरड्यासारखा रंग बदलला आहे, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला.



या विधेयकाच्या समर्थनार्थ आता महाराष्ट्रातून एक कोटी महिलांच्या स्वाक्षऱ्या गोळा करण्यात येणार असून राज्यभर मेळावे आयोजित करून काँग्रेस, शरद पवार यांचा पक्ष आणि उबाठा गटाचा महिलाविरोधी चेहरा उघडा केला जाईल. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोवर स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. तालुका स्तरापर्यंत मोर्चे, प्रदर्शन आणि महिला संघटनांमार्फत आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राहुल गांधींवर टीका करताना मुख्यमंत्री म्हणाले की, खोटे बोलण्याच्या जर ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या, तर त्याचे सुवर्णपदक राहुल गांधींनाच मिळेल. संविधानाने दिलेल्या संकेतानुसारच हे विधेयक असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्या या नेत्यांनी महिलांची साष्टांग दंडवत घालून माफी मागायला हवी.

महात्मा फुलेंच्या २०० व्या जयंती वर्षातच त्यांच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम विरोधकांनी केले आहे. १९७१ ची लोकसंख्या गोठवून करण्यात आलेल्या रचनेत बदल करणे आणि प्रत्येक राज्याला समान संधी देणे हे पंतप्रधान मोदींचे उद्दिष्ट होते. या नवीन रचनेमुळे दक्षिण भारतातील राज्यांवर अन्याय होणार नव्हता, उलट त्यांचे प्रतिनिधित्व वाढणार होते, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. प्रियंका गांधींवर बोलताना त्यांनी नमूद केले की, त्या राजकारणात नव्या असल्याने कदाचित त्यांना त्यांच्या लोकांनी पूर्ण माहिती दिली नसेल, त्यामुळे मी त्यांना दोष देत नाही. मात्र, २०११ च्या जनगणनेनुसार २०२९ ला हे विधेयक लागू व्हावे ही सरकारची शुद्ध भावना होती, जिला विरोधकांनी खीळ घातली. आता जनमताचा असा अभूतपूर्व रेटा उभा केला जाईल की, विरोधकांना गुडघे टेकून महिलांच्या हक्कांना मान्यता द्यावी लागेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

सध्याच्या परिस्थितीत २०११ च्या जनगणनेच्या आधारावर डिलिमिटेशन करून २०२९ पर्यंत महिला आरक्षण लागू करता येऊ शकते, असे मत मुख्यमंत्र्यांनी मत मांडले. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढूनही लोकसभेतील जागा न वाढवल्यास लोकशाहीतील प्रतिनिधित्व कमी होईल, अशीही चिंता त्यांनी व्यक्त केली. जर विधेयक मंजूर झाले असते तर सुमारे २७३ महिला संसदेत पोहचल्या असत्या. तसेच अनुसूचित जाती आणि जमातींसाठीच्या जागांमध्येही वाढ झाली असती, परंतु विरोधकांच्या भूमिकेमुळे हा मार्ग अडवला गेला, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला.

#### काँग्रेसची नेहमी महिला विरोधी भूमिका

*विरोधकांवर टीका करताना मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस आणि त्यांच्या सहयोगी पक्षांनी नेहमीच महिला विरोधी भूमिका घेतल्याचे सांगितले. शाहबानो प्रकरणाचा उल्लेख करत, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बदलण्यासाठी संविधानात बदल करणारी काँग्रेस असल्याचा आरोपही फडणवीस यांनी केला. भाजपने महिलांना संधी दिल्याचं उदाहरण म्हणून वसुंधरा राजे, उमा भारती, सुषमा स्वराज आणि आनंदीबेन पटेल यांच्या मुख्यमंत्रिपदाचा उल्लेख केला.*

#### 'ओपन डिबेट'चे विरोधकांना आव्हान

*राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या वक्तव्यांवरही टीका करत महिला आरक्षणाशी ओबीसी जनगणनेचा संबंध नाही, असे स्पष्ट करत, जात जनगणना पहिल्यांदाच मान्य केल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. तसंच या पार्श्वभूमीवर विरोधकांना 'ओपन डिबेट'चे आव्हान त्यांनी दिले आणि ते या विषयावर चर्चा करण्यास पुढे येणार नाहीत, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. राहुल गांधी यांनी देशभरातील महिलांची माफी मागितली पाहिजे, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.*



## महिला सक्षमीकरणासाठी भाजपचे सदैव प्राधान्य -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष नेहमीच महिलांना शक्ती देण्याचे आणि त्यांना सक्षम करण्याचे काम करते, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेलमध्ये नगरसेविका राजश्री वावेकर यांनी सुरू केलेल्या जनसंपर्क कार्यकर्त्याच्या उद्‍घटनावेळी केले तसेचया नवीन कार्यालयाच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांच्या समस्या तातडीने सुटतील आणि जनसेवेचे कार्य अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका तथा भाजप महिला मोर्चाच्या नवीन पनवेल अध्यक्षा राजश्री वावेकर यांनी प्रभाग क्रमांक १६ मध्ये अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर भारतीय जनता पार्टीचे जनसंपर्क कार्यालयाचे सुरु केले आहे. या कार्यलयाचे उदघाटन महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, उपमहापौर प्रमिला पाटील, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, संतोष शेट्टी, राजश्री वावेकर, अस्मिता घरत आणि माजी नगरसेविका संगीता कांडपाल, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, भाजप नेते महेंद्र वावेकर, अशोक भगत, जितेंद्र तिवारी यांसह अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याच कार्यक्रमाचे औचित्य साधून देवेंद्र परब यांचा वाढदिवसही सर्व उपस्थितांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. या जनसंपर्क कार्यालयामुळे प्रभागातील नागरिकांना आपल्या तक्रारी आणि सूचना मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये यात्रेकरूंच्या बसचा अपघात; २० प्रवासी ठार

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमध्ये यात्रेकरूंच्या बसचा भीषण अपघात झाला असून या दुर्दैवी घटनेत २० प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. उधमपूरमध्ये झालेल्या बस अपघाताने संपूर्ण देशाला हादरवून सोडले असून रामनगरच्या कागोत परिसरात ही बस अनियंत्रित झाल्याने पलटी झाली. या दुर्घटनेत बसमधील २० यात्रेकरु ठार झाले असून ३० प्रवाशी जखमी झाल्याची माहिती आहे.



प्राथमिक माहितीनुसार बसचे टायर फुटल्याने आणि वेगामुळे बस अनियंत्रित होऊन पलटी झाली. मात्र, अपघाताची नेमकी कारणे, आणि सखोल माहिती घेण्याचं काम पोलिसांकडून सुरू आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उधमपूर अपघाताच्या घटनेवर शोक व्यक्त केला. या दुर्घटनेत लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो, अपघातामधील जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्यात येईल, असे ट्विट पंतप्रधानांनी केले आहे.

## भारत-कोरिया यांच्यात करार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण कोरिया यांनी त्यांच्या व्यापक आर्थिक भागीदारी कराराला (सीईपीए) अद्ययावत करण्यासाठी चर्चा सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे-म्युंग यांच्यात सोमवारी हैदराबाद हाऊसमध्ये झालेल्या द्विपक्षीय बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली. या दरम्यान दोन्ही देशांमध्ये अनेक सामंजस्य करार (एमओयू) आणि इतर महत्त्वपूर्ण करारांची देवाणघेवाण करण्यात आली.

## जनगणनेच्या कामामुळे बदल्यांना स्थगिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

जनगणनेच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जिल्हा परिषद कर्मचारी आणि शिक्षकांच्या बदल्यांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतल्याने कर्मचारी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जनगणनेच्या कामात गुंतलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांसह गट 'क' आणि गट 'ड' संवर्गातील कर्मचाऱ्यांची यावर्षी सर्वसाधारण बदली प्रक्रिया राबवू नये, असे आदेश ग्रामविकास विभागाने दिले आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे बदलीपात्र कर्मचारयांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

ग्रामविकास विभागाच्या उपसचिव वैशाली डिगे यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना यासंदर्भात पत्र पाठवून स्पष्ट निर्देश दिले आहेत. जनगणनेचे काम अत्यंत महत्त्वाचे असून त्यात कोणताही व्यत्यय येऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, जनगणनेशी संबंधित माहिती संकलनाची प्रक्रिया सध्या सुरू आहे. पंचायत समितीनिहाय जनगणना कामात नेमके कोणते कर्मचारी व शिक्षक कार्यरत आहेत, याची अधिकृत माहिती अद्याप जिल्हा परिषद मुख्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. ही माहिती प्राप्त झाल्यानंतरच नेमक्या किती कर्मचाऱ्यांच्या बदल्या स्थगित राहणार आणि किती जणांची बदली होणार, याचे स्पष्ट चित्र समोर येणार आहे.

दरवर्षी १० वर्षे सेवा पूर्ण केलेले किंवा एकाच ठिकाणी सलग ५ वर्षे सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या ३१ मेपूर्वी केल्या जातात. मात्र यंदा जनगणनेच्या पार्श्वभूमीवर या प्रक्रियेत बदल करण्यात आला असून, केवळ जनगणना कामात नियुक्त नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या ३१ मे २०२६ पूर्वी पूर्ण केल्या जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

या निर्णयामुळे जनगणनेच्या कामात सहभागी असलेल्या हजारो कर्मचाऱ्यांना यावर्षी सध्याच्या ठिकाणीच सेवा बजावावी लागणार आहे. त्यामुळे वारंवार बदल्यांच्या ताणातून काही प्रमाणात दिलासा मिळाल्याची भावना कर्मचारी वर्गातून व्यक्त होत आहे, **(पान २ वर..)**

## मुंबईतही भोंदू फकीर अटकेत

**मुंबई :** स्वतःला फकीर बाबा म्हणवून महिलांची फसवणूक करणाऱ्या एका भोंदू फकीराला पोलिसांनी अटक केली आहे. महिलांना त्यांच्या वैयक्तिक समस्या आणि दुःखावर उपाय सांगण्याच्या नावाखाली जाळ्यात ओढून त्यांना बेशुद्ध करून अत्याचार केल्याचा गंभीर आरोप या आरोपीवर करण्यात आला आहे. इरफान नियाज अहमद (वय ३४) असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील बहराइच येथील रहिवासी आहे. गेल्या काही वर्षांपासून तो मुंबईत वास्तव्यास होता. कांदिवली परिसरात स्वतःला फकीर बाबा म्हणून लोकांचा विश्वास संपादन करत होता.

## युवा शक्ती जागर यात्रेनिमित्त कृष्णराज महाडिक यांचा उत्तर रायगड दौरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष व युथ आयकॉन कृष्णराज महाडिक मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ रोजी उत्तर रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. युवा शक्ती जागर यात्रेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांद्वारे युवकांशी संवाद साधण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

दौऱ्याची सुरुवात दुपारी ३.०० वाजता पनवेलमधील गार्डन हॉटेल येथून भव्य बाईक रॅलीद्वारे स्वागताने होणार आहे. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात येईल. दुपारी ४:०० वाजता श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळसभागृहात युवा पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात संघटनात्मक बळकटीकरण व आगामी उपक्रमांवर चर्चा होणार आहे. सायंकाळी ५. ३० वाजता वडाळे तलाव येथे KM' तरुणाई व सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स सोबत विशेष meet-up आयोजित करण्यात आला असून, डिजिटल माध्यमातून युवकांशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांना युवक, युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे आणि पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## माणगावमध्ये तरुणीची हत्या

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील लॉजिंगमध्ये तरुणीची निर्घुण हत्या झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

लोणेरे येथील मुंबई गोवा महामार्गालगत ओमकार रेसिडेन्सी येथे २० एप्रिल रोजी रुम नंबर १०१ मध्ये हॉटेल सफाई कामगार गेला असता दरवाजा ठोकावल्यानंतर आतून कोणताही प्रतिसाद आला नाही. त्यामुळे लॉजिंग चालकाला संशय आल्याने त्यांनी तातडीने गोरेगाव पोलीस ठाणे येथे संपर्क केला. पोलिसांनी रूमचा दरवाजा तोडून आत प्रवेश केल्यानंतर तरुणी बेडवर, ब्लँकेट अंगावर असलेल्या अवस्थेत दिसून आली. पोलिसांनी ब्लँकेट हटविले असता रक्तबंबाळ अवस्थेत धारदार शस्त्राने तरुणीवर वार केल्याचे निदर्शनास आले. तातडीने फॉरेन्सिक टीम, डॉग स्कॉड घटनास्थळी दाखल झाले असून तपास सुरू आहे. मृत तरुणीचे वय अंदाजे २२ वर्षे असून ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. अज्ञात तरुणीवर शस्त्राने वार करून फरार झाला आहे.




# 'संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सज्ज'

**मुंबई : प्रतिनिधी**




संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी, प्रभावी अंमलबजावणी आणि समन्वयाच्या माध्यमातून या आपत्तीचे सौम्यीकरण करण्यात यावे. यासाठी सर्व विभागांनी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषि, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांच्यासह कृषी, मदत व पुनर्वसन, वित्त, जलसंपदा, जलसंधारण, भारतीय हवामानशास्त्र विभाग, वित्त व नियोजन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवण्याची शक्यता असून पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी राहील, मात्र उष्णतेच्या लाटा अधिक प्रमाणात येण्याची शक्यता वर्तविण्यात आली. दरम्यान, पॉझिटिव्ह 'आयओडी' विकसित झाल्यास एल निनोच्या परिणामांची तीव्रता काही प्रमाणात कमी होऊ शकते, असेही यावेळी सांगण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, २०१५ मध्ये पावसाळा संपल्यानंतर राज्यातील पाणीसाठा केवळ ४५ टक्के होता, मात्र सध्या पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तितका साठा उपलब्ध आहे. त्यामुळे योग्य नियोजन केल्यास राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल. २०१५ मधील एल निनोच्या कालावधीतील अनुभवावरून २०१८ या वर्षी उपाययोजना केल्यामुळे पिके वाचविता आली. एल निनोच्या कालावधीत पावसातील अनियमिततेमुळे विशेषतः मराठवाड्यात मोठा परिणाम दिसून आला होता. दोन पावसाच्या सरींमध्ये दीर्घ खंड पडल्यास पिकांवर ताण येतो, मात्र संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून पिकांचे नुकसान कमी करता येते. त्यामुळे जलसंधारण व पाणी साठवण क्षमतेत वाढ करणे अत्यावश्यक आहे.

यासाठी जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार या योजनांची कामे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या कामांसाठी वित्त विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच जुन्या जल स्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे.

यामुळे कमी पैशात जास्त पाणी साठा उपलब्ध होईल. कमी पावसाच्या परिस्थितीतही सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणारी हीच साधने प्रभावी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. 'जी रामजी योजने'तून होणारी जलयुक्त शिवारची कामे योग्य प्रकारे झाली आहेत की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच जी रामजी मधून जास्तीत जास्त कामे मिळविण्यासाठी टास्क फोर्स तयार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# खालापूर पोलीस आणि दामिनी पथकाने बालविवाह रोखले

**चौकः प्रतिनिधी**



खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या नेतृत्वाखाली अक्षय तृतीया मुहूर्तावर चौक विभागात दोन बाल विवाह दामिनी पथक प्रमुख स्वप्नाली पवार यांनी रोखल्याने एक अनिष्ट प्रथा थांबली.

दामिनी पथक महिला पोलीस हवालदार स्वप्नाली पवार व महिला पोलीस शिपाई केंद्रे यांनी खालापूर पोलीस स्टेशन हद्दीत बालविवाह प्रतिबंधक मोहीम अंतर्गत पेट्रोलिंग करत असताना वावंढळ आदिवासी आनंदवाडी व भिलवले ठाकूरवाडी येथे गस्त घालत असताना दोन्ही ठिकाणी त्यांना अल्पवयीन विवाह होत असल्याचे दिसून आल्याने त्यांनी त्वरीत त्यांचे जन्मदाखले आणि आधार कार्ड ची तपासणी केली असता वधू वर अल्पवयीन असल्याचे दिसून आले.

महिला पोलीस हवालदार स्वप्नाली पवार यांनी ही बाब त्वरीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना कळवली. पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या सूचनेनुसार त्यांनी वधू वर यांच्या आई वडिल व त्यांचे नातेवाईक,पोलिस पाटील, सरपंच,चौक प्रभारी विशाल पवार यांची बैठक घेतली व बैठकी मध्ये त्यांना बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ बाबत माहिती दिली व त्यांना मुलगी व मुलाचे वय कायद्यानुसार योग्य झाल्यानंतर लग्न करण्याची माहिती दिली.हे दोन्ही वधू वर पक्षांनी मान्य करून कायद्यानुसार लग्न करू असे आश्वासन दिले.

त्या नंतर दामिनी पथकाने होत असलेल्या विवाह ठिकाणी भेट देऊन वधू वर यांच्या वयाची माहिती घेतली.आंबेवाडी, बोरगाव आदिवासी वाडी,चांग वाडी, भिलवले ठाकूरवाडी, भिलवले आदिवासी वाडी, खैराट व अन्य आदिवासी वाडीत जाऊन बाल विवाह प्रतिबंधक कायदा, अल्पवयीन विवाह याचे शारीरिक परिणाम याची माहिती देऊन बाल विवाह रोखण्याचे आवाहन केले. CWC समिती समोर अल्पवयीन मूल, मुली यांना हजर करण्यात येणार आहे, भिलवले पोलीस पाटील अनंत ठोंबरे यांनी याबाबत वेळीच तत्परता दाखवली.

सरपंच हे ग्राम बाल संरक्षण समितीचे अध्यक्ष असून पोलिस पाटील हे गाव व पोलिस स्टेशन यांना जोडणारा मुख्य दुवा आहे. सरपंच, ग्रामसेवक, पोलिस पाटील यांनी गावात कोणाचा विवाह ठरल्यास त्या मुला–मुलीच्या वयाची खात्री करावी. जेणेकरून गावात बाल विवाह होणार नाही व खालापूर तालुका हा बालविवाह मुक्त होईल. यामध्ये कुचराई करू नये, असे आवाहन पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.बालविवाह केल्यास दोन लाख रुपये दंड किंवा पाच वर्षे सक्त मजुरी किंवा दोन्ही शिक्षा यात आहेत.

# जेएसडब्ल्यू कंपनीच्या स्लॅग वेस्टमुळे शेतीसोबत तळ्यातील मासेमारीही धोक्यात

## शेतकऱ्यांचा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा

**नागोठणे : बातमीदार**



मुंबई गोवा महामार्ग क्र. 66 परिसरातील नागोठणे जवळील पेण तालुक्यातील कोलेटी ते तळेखार गावांच्या हद्दीत जेएसडब्ल्यू कंपनीकडून सुरू असलेल्या रस्ते बांधकामावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने तहसीलदार पेण यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, कंपनीकडून "स्लॅग वेस्ट मटेरियल" वापरून रस्ते तयार केले जात असून, हा प्रकार अधिकाऱ्यांच्या स्पष्ट आदेशांचे उल्लंघन असल्याचा आरोप करण्यात आला आहे. २७ मार्च २०२६ रोजी झालेल्या बैठकीत अशा मटेरियलचा वापर करू नये, असे निर्देश देण्यात आले होते. तरीही कंपनीने मनमानी सुरूच ठेवल्याचा शेतकऱ्यांचा दावा आहे.

दरम्यान, या परिसरात रस्त्यालगत अनेक तळी (तळे) असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. केमिकलयुक्त स्लॅग वेस्ट पावसाच्या पाण्यासोबत तळ्यांमध्ये मिसळल्यास मासेमारीवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे स्थानिक मच्छीमारांचे उदरनिर्वाह धोक्यात येण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले की, "आमचे पोट शेती आणि मासेमारी या दोन्हीवर चालते. जर तळ्यांचे पाणी दूषित झाले, तर दोन्ही व्यवसाय संकटात येतील." त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित काम थांबवावे व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.सोमवार दि. 29 एप्रिल रोजी पेण तहसील कार्यालयात शेतकऱ्यांनी तक्रार सादर केली

# जपानमध्ये भूकंप, त्सुनामीचीही धडक

**टोकियो : वृत्तसंस्था**

सोमवारी जपानच्या ईशान्य किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरात ७.४ रिश्टर स्केल तीव्रतेचा जोरदार भूकंप झाला. जपानच्या हवामान विभागाने याला दुजोरा दिला आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू उत्तर इवाते प्रांताजवळ समुद्रात होता. स्थानिक वेळेनुसार दुपारी ४:५३ वाजता या भूकंपाचा धक्का जाणवला. भूकंपाची खोली १० किलोमीटर असल्याने त्याची तीव्रता अधिक जाणवली.

या भूकंपाचे धक्के केंद्रापासून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या टोकियो पर्यंत जाणवले. टोकियोमधील उंच इमारती हलल्या, तर अनेक भागांमध्ये नागरिकांना तीव्र कंप जाणवले. सध्या मोठ्या प्रमाणात जीवित किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती नसली, तरी प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. दरम्यान, क्योडो वृत्तसंस्थेनुसार, टोकियो–आओमोरी बुलेट ट्रेन मार्गावरील सेवा तात्पुरती थांबवण्यात आली आहे.

# चौक येथे माकडांची दहशत

## ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठेच्या लगत असलेल्या घरांमध्ये काही दिवसांपासून माकडांच्या वाढत्या उपद्रवामुळे विशेषतः महिला वर्ग शाळकरी मुले,ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.माकडांनी घरात घुसून केलेल्या अचानक हल्ल्यामुळे नागरिक पुरते हैराण झाले आहेत.



यामुळे या माकडांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी येथील ग्रामस्थ वनखात्याकडे करणार आहेत.

मागील काही दिवसांपासून या भागात माकडांच्या वावर मोठ्या प्रमाणात वाढत चालला असून.घरामध्ये किंवा घराच्या छपरावर बसून नासधूस करण्यास ते धन्यता मानत आहे.त्याच बरोबर काही माकडे घरात घुसून भांडी पाडणे, अन्नधान्य पळवणे, पाण्याचा नल चालू ठेवणे, उन्हात ठेवलेले खाद्य पदार्थ पळवून नेणे, लहान मुलांना धाक दाखवणे यासारख्या घटनांनी ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

काही महिलेच्या सांगण्याप्रमाणे, "माकड घरात घुसले की आम्ही लपतो.त्याच बरोबर मुले शाळेतून घरी येताना घाबरतात." शाळकरी मुलांना विशेष धोका निर्माण झाला असून,माकडांना पकडण्यासाठी जाळे किंवा इतर उपाययोजना तात्काळ कराव्यात," अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# माथेरान नगरपालिकेतर्फे ई–रिक्षा वाटप; भाजपचा आक्षेप

**नेरळ : प्रतिनिधी**




माथेरान नगरपालिकेच्या चार ई–रिक्षा वाटपावरून मोठा राजकीय संघर्ष उभा राहिला असून भाजपने या प्रक्रियेवर तीव्र आक्षेप घेत नगरपालिकेवर धडकले आहे. आधीच हात रिक्षाचालकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असताना नव्या घडामोडींमुळे वातावरण आणखी तापले आहे.

माथेरानमध्ये एकूण ९४परवानाधारक हात रिक्षाचालक असून त्यापैकी २० जणांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ई–रिक्षा देण्यात आल्या आहेत. मानवाला मानव ओढणारी ही अमानवी प्रथा माथेरान मध्ये बंद झाली पाहिजे या हेतूने या इ रिक्षाला परवानगी मिळाली आहे.मात्र उर्वरित ७४रिक्षाचालकांच्या पुनर्वसनाबाबत अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. हे सर्व चालक ई–रिक्षांच्या प्रतीक्षेत असतानाच नगरपरिषदेकडून पायलट प्रोजेक्टअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या ७ई–रिक्षांपैकी ४ रिक्षा थेट ७४ पैकी काही निवडक चालकांना देण्यात आल्याने वादाला तोंड फुटले.यापूर्वी लॉटरी पद्धतीने चिठ्ठ्या काढून रिक्षा वाटप करण्यात आले होते, मात्र यावेळी ती पद्धत का वापरण्यात आली नाही, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे.

या निर्णयाविरोधात माथेरान भाजप आक्रमक झाली असून रिक्षाचालकांना सोबत घेऊन नगरपरिषद कार्यालयात धडक देण्यात आली. भाजप नेते प्रदीप घावरे यांनी पक्षपात झाल्याचा आरोप करत, सर्व रिक्षाचालकांना न्याय मिळाला नाही तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

या सर्व आरोपांवर प्रतिक्रिया देताना नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी पक्षपाताचे आरोप फेटाळून लावले.

# शिवसेनेकडून काँग्रेसचा जाहीर निषेध

## नारीशक्ती विधेयकाला विरोध



**महाड : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने संसदेत सादर केलेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियम' या महिला आरक्षणासंबंधीच्या घटना दुरुस्ती विधेयकाला इंडिया आघाडीकडून, विशेषतः भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कडून झालेल्या तीव्र विरोधाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात निषेधाची लाट उसळली असून त्याचे पडसाद महाड शहरातही उमटले. एनडीएचा घटक पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे गट) तर्फे काँग्रेसच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविण्यात आला.

शनिवार, १८ एप्रिल रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या या निषेध आंदोलनात शिवसेनेचे पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी 'महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या काँग्रेसचा निषेध असो', 'नारीशक्तीचा अपमान सहन केला जाणार नाही' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

या वेळी वयांनी काँग्रेसवर जोरदार टीका करताना महिला सक्षमीकरणाबाबत दुटप्पी भूमिका घेतल्याचा आरोप केला. केंद्र सरकारने महिलांना राजकीय सक्षमीकरणासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले असताना विरोधकांनी राजकारणाच्या पातळीवर अडथळे निर्माण केल्याचेही त्यांनी नमूद केले. महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे हे विधेयक देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असून त्याला विरोध करणे म्हणजे महिलांच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न असल्याची भावना यावेळी महिला प्रतिनिधींकडून व्यक्त करण्यात आली.या आंदोलनावेळी महाड पंचायत समिती सभापती प्रेरणा सावंत, नगराध्यक्ष सुनील कविस्कर, शिवसेना जिल्हा प्रवक्ता नितीन पावले, दक्षिण रायगड जिल्हा समन्वयक राजेश देशमुख, शहर प्रमुख डॉ. चेतन सुर्वे, तालुका संघटक समीर म्हामुणकर, युवा सेना शहर प्रमुख सिद्धेश मोरे यांच्यासह पंचायत समिती सदस्य रेणुका देशमुख, महिला आघाडी प्रमुख नगरसेविका विद्या देसाई, नगरसेविका मीनल जाधव, माजी पंचायत समिती सभापती सपना मालुसरे, जान्हवी विचारे तसेच आजी–माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, पंचायत समिती सभापती प्रेरणा सावंत यांनी आपल्या प्रतिक्रियेतून काँग्रेसवर निशाणा साधताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, "महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण हे आमच्या हक्काचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयकाला काँग्रेसने जाणीवपूर्वक विरोध केला. त्यामुळे काँग्रेसचा महिलांविषयीचा खरा चेहरा उघड झाला असून आमच्या हक्काचे आरक्षण हिरावून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेस पक्षाचा आम्ही जाहीर निषेध करतो."

या निषेध आंदोलनामुळे महाड शहरात काही काळ राजकीय वातावरण तापलेले पाहायला मिळाले.

पान १ वरुन

## जनगणनेच्या कामामुळे बदल्यांना स्थगिती

ज्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कारणास्तव किंवा कौटुंबिक गरजांमुळे विनंती बदली अपेक्षित होती, त्यांच्यासाठी ही स्थगिती अडचणीची ठरू शकते. विनंती बदल्यांबाबत शासनाकडून अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका जाहीर करण्यात आलेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. जनगणनेच्या कामाला प्राधान्य देत शासनाने घेतलेला हा निर्णय प्रशासनिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात असला, तरी विनंती बदल्यांबाबत लवकरच स्पष्टता देण्याची अपेक्षा कर्मचारी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, जनगणेनसाठी किती कर्मचारयांची गरज आहे हे प्रशासनाने निश्चित केले असले तरी आपल्या विभागाकडून किती कर्मचारी या कामासाठी लागणार आहेत याची माहिती संकलीत केली जात असून प्रत्येक विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्रव्यवहार सुरू करण्यात आला आहे.

# श्रीवर्धनमध्ये फोरकॉन कंपनीच्या मुजोरीला लोकप्रतिनिधींचा लगाम



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील नारायण पाखाडी उत्तर विभाग ते सावरकर चौक दक्षिण विभाग दरम्यानच्या रस्त्यांची 'फोरकॉन' कंपनीच्या अवजड वाहतुकीमुळे दाणादाण उडाली आहे. या गंभीर प्रश्नावर नवनिर्वाचित नगरसेवकांनी आक्रमक पवित्रा घेत कंपनीला धारेवर धरले असून, प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन प्रशासकीय यंत्रणेला जाब विचारला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून तरी बंदर दांडा परिसरात सुरू असलेल्या बांधकामासाठी 'फोरकॉन' कंपनीमार्फत माती आणि दगडांची वाहतूक केली जात आहे. मात्र, ही वाहतूक करताना मर्यादेपेक्षा जास्त भार (ओव्हरलोड) वाहून नेला जात असल्याने रस्त्यांची क्षमता संपली आहे. परिणामी, रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून बाजूचे पिचिंगही पूर्णपणे ढासळले आहे. या दुरवस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती सुप्रिया कैलास चोगले यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आक्रमक पवित्रा घेतला. त्यांच्या पुढाकाराने भाजपाचे नगरसेवक प्रणील बोरकर आणि राष्ट्रवादीचे नगरसेवक प्रसाद विचारे यांनी फोरकॉन कंपनीचे डीपीएम काशिनाथ पाटील यांच्यासह बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी नगरसेवकांनी कंपनीच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला. लोकप्रतिनिधींच्या या आक्रमक भूमिकेपुढे अखेर कंपनीने नमते घेत, झालेले नुकसान तातडीने दुरुस्त करण्याचे मान्य केले आहे.

राष्ट्रवादीचे नगरसेवक प्रसाद विचारे यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदितीताई तटकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेमध्ये हा विषय अत्यंत प्रभावीपणे मांडला. मंत्र्यांच्या कानावर हा विषय गेल्यामुळे आता नगरपरिषद प्रशासन आणि कंपनीवर मोठा दबाव निर्माण झाला आहे.. सत्ताधारी आणि विरोधक या प्रश्नावर एकवटल्याने श्रीवर्धनमधील रस्ते दुरुस्तीचा मार्ग मोकळा होणार असल्याचे चिन्ह दिसत आहे.

# महड गावात हॉर्न वाजवण्यावरून हाणामारी

**खोपोली : प्रतिनिधी**

घरासमोरून जाताना स्कुटर वेगाने नका चालवू, मोठयाने हॉंर्न वाजवू नकोस असे सांगितल्याने मनात राग धरून खंडू जगदीश नायर वय ६७ महड याला ओमकार विनायक पाटील आणि दत्तात्रय देवराम माने दोघे रा. महड यांनी शिवीगाळी व हाताबुक्याने मारहाण करून डोक्यात दगड मारून दुखापत केल्याची तक्रार नायरने खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे.

नायर आणि माने महड येथे एकमेकांचे शेजारी राहतात. रविवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास ओमकार याला खंडू नायर यांनी घरासमोर जाताना हॉर्न वाजवू नको असे सांगितल्याने वाद सुरू झाला. ओमकार याने खंडू यांच्या डोक्यात दगड मारून दुखापत केली अशी तक्रार खंडू याने खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. तर दत्तात्रय माने यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचे नातू ओंकार पाटील यांना खंडू नायर लाकडी दांडक्याने मारहाण करत असल्याने माने भांडण सोडवण्यासाठी गेले असता त्यांना देखील खंडू याने मारहाण केली.

# डिजिटल अटकेच्या जाळ्यात ओढून फसवणूक

## खारघरमध्ये दाम्पत्याला ३५ लाख ५५ हजार रुपयांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

अतिरेकी मनी लॉंडरिंग, कारवाईमध्ये सहभाग असल्याची भीती घालून एक सायबर टोळीने खारघरमधील दाम्पत्याला डिजिटल अटकेच्या जाळ्यात ओढून त्यांच्याकडून तब्बल ३५ लाख ५५ हजार रुपये लुटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सायबर टोळीने या दाम्पत्याला सलग १५ दिवस दहशतीखाली ठेऊन ही लूट केल्याचे उघडकीस आले आहे. या टोळीचा खारघर पोलीस शोध घेत आहेत.




या प्रकरणात लुटले गेलेले सेवानिवृत्त दाम्पत्य खारघर सेक्टर ३ परिसरात राहण्यास असून २५ मार्च रोजी सायबर टोळीने या दाम्पत्यातील महिलेला आयटी विशाल या नावाने संपर्क साधला होता. त्यानंतर त्याने आपण 'डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडिया'मधून बोलत असल्याचे भासवून, त्यांच्या नावाने घेतलेल्या एका मोबाइल क्रमांकामुळे कुलाबा पोलिस ठाण्यात त्यांच्याविरोधात सलग १५ दिवस दहशतीखाली ठेवले गुन्हा दाखल झाल्याचे सांगितले. पोलिस अधिकाऱ्याचा गणवेश घातलेल्या आरोपीने या महिलेला व्हॉट्सॲपवर व्हिडिओ कॉल करून त्यांना 'डिजिटल अरेस्ट' केले. सायबर टोळीने या महिलेला व त्यांच्या पतीला दर ३ तासांनी 'वुई आर सेफ' असा मेसेज पाठवण्यास भाग पाडले. तसेच, ही माहिती कोणालाही सांगितल्यास गंभीर परिणाम होतील, अशी धमकीही दिली. त्यानंतर सायबर टोळीने या दाम्पत्याच्या बँक खात्यातील रक्कम आरबीआय आणि एफआययूकडून तपासणी करून परत करण्याचा बहाणा केला.

अशा पद्धतीने २६ मार्च ते १० एप्रिल या कालावधीत या दाम्पत्याने गुगल पे आणि आरटीजीएसद्वारे एकूण ६ व्यवहार करून एकूण ३५ लाख ५५ हजार रुपये आरोपींच्या खात्यात जमा केले.

# पनवेल रेल्वेस्थानकात लिफ्ट कोसळली; चार प्रवाशांची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

आज आठवड्याचा पहिला दिवस आणि ऑफिसला जाणाऱ्यांची लगबग असतानाच पनवेल रेल्वे स्थानकात मोठी दुर्घटना घडली. पनवेल रेल्वे स्थानकात प्लॅटफॉर्म नंबर ७ वर लिफ्ट कोसळली. ४ प्रवासी अडकले होते.



पहाटेची वेळ होती, लांब पल्ल्याच्या गाड्या येत जात होत्या. प्रवाशांची गर्दी स्थानकात होती. ही लिफ्टवरून खाली येत असताना कोसळली. चार प्रवासी अडकले होते त्यांना रेस्क्यू करून बाहेर काढण्यात आले. एकंदरीतच रेल्वे प्रवाशांसाठी बसवण्यात आलेल्या लिफ्ट या नादुरुस्त किंवा मेंटेन केल्या जात नाहीत हे या निमित्ताने पुन्हा निदर्शनास आलं आहे.

पनवेल हे वर्दळीचं ठिकाणी आहे. तिथे लांब पल्ल्याच्या गाड्या, लोकल शिवाय मेमू ट्रेन्स देखील जात असतात. त्यामुळे या स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी असते. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी ऑफसला जाण्याची देखील गर्दी प्रवाशांची होत असतानाच ही मोठी दुर्घटना प्लॅटफॉर्म नंबर ७ वर घडली आहे.

लिफ्ट कोसळल्याने प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाली आहे. लिफ्ट कोसळल्या प्रकरणी चौकशी केली जाणार आहे. लिफ्ट कशी कोसळली यामागचं कारण अद्याप समजू शकलं नाही. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी दुर्घटना घडल्याने भीतीचं वातावरण आहे.

# पार्किंगमधून दुचाकीची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

कामा निमित्ताने जाताना खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंग मध्ये उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

आदई वसाहतीमधील रहिवाशी अभिषेक यांनी मुंबई येथे कामा निमित्ताने जाताना स्वतःच्या मालकीची टीव्हीएस एन्टर्क मोपेड दुचाकी खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंग मध्ये उभा केली होती, मात्र कामावरून आल्यानंतर ते पार्किंग मध्ये आले असता त्यांची दुचाकी पार्किंग मध्ये त्यांना दिसून आली नाही. त्यांनी शोध घेतला मात्र दुचाकी मिळून आली नाही ती मुळे त्यांनी कामोठे पोलिस ठाण्यात वाहन चोरीची तक्रार देखील नोंदवली, पोलिसांनी तपास सुरू केल्या नंतर चोरटा खुद्द पार्किंग वे पैसे भरून गाडी घेऊन जाताना दिसत आहे.

# भारती विद्यापीठातील महिला वसतिगृहात शिरला अजगर

**पनवेल :** तापमान वाढल्याने वन्यजीव मानवी वस्तीत शिरत असन्याच्या घटना विशेषतः उन्हाळ्यात घडत असतात. अशीच घटना खारघर येथील भारती विद्यापीठातील महिला वसतिगृहात घडली. वसतिगृहामध्ये आठ फूट लांबीचा अजगर शिरल्याने तरुर्णींची तारांबळ उडाली.

महिला वसतिगृहात अजगर आल्याचे वसतिगृहामधील काही मुलींना दिसला. त्यांनी तत्काळ वसतिगृह प्रशासनाला याबाबत माहिती दिली. वसतिगृह कर्मचाऱ्यांनी सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांना याबाबत कळवले असता, त्यांनी तत्काळ घटनास्थळी येत अजगराला पकडले. जगराने त्या ठिकाणच्या कंबुतराला भक्ष्य केल्याचे दिसून आले. मोरे यांनी अजगराला पकडून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. जंगल भागातील मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीव मानवी वस्तीत शिरकाव करत आहेत.

# खारघरमध्ये गाड्यांची एकमेकांना धडक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात सोमवारी दुपारच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. पनवेलकडे जाणाऱ्या मार्गिकेवर ५ ते ६ वाहनांची साखळी धडक झाल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली.



मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी अचानक एका वाहनाने ब्रेक लावल्यानंतर मागून येणाऱ्या वाहनांनी एकमेकांना धडक दिली. या साखळी अपघातात अनेक चारचाकी गाड्यांचे मोठे नुकसान झाले असून काही वाहनांच्या पुढील भागाचे चेंदामेंदा झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि वाहतूक विभागाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले असून काही जणांना किरकोळ दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

या घटनेमुळे पनवेलकडे जाणाऱ्या मार्गावर काही काळ मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत करण्याचे काम केले. दरम्यान, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून अधिक तपास सुरू आहे.

# रेल्वे स्टेशन परिसरात पोलीस चौकीसह पे ॲण्ड पार्क पार्किंग व्यवस्था सुरू करा

## नगरसेविका शिवानी घरत यांची मागणी; निवेदन सादर

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील परिसरात पोलीस चौकी उभारणे व महापालिकेच्या माध्यमातून पे ॲण्ड पार्क पार्किंग व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी नगरसेविका ॲड. शिवानी घरत यांनी पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे.

नवीन पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ असते विशेषतः रात्रीच्या वेळी महिलां सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरेशी त्यामुळे त्या ठिकाणी पोतीस चौकी उभारणे अलीत आवश्यक आहे, जेणेकरून कापदा व सुव्यवस्था राखती जाईल आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल तसेच सदर परिसरात पार्किंगची मोठी समस्या निर्माण झाली असून अनेक वाहनधारकांकढून अनधिकृत मार्किंग केले जाते. स्टेशनच्या जवळच असलेल्या रिकाम्या जागेचा पोग्य वापर करून पनजेत महानगरपालिकेमार्फत तेथे पे ॲण्ड पार्क पद्धतीने नियोजित पार्किंग सुविधा उभारण्यात यावी अशी विनंती आहे गामुळे वाहतूक कोडी कमी होईल तसेच शिस्तबद्ध पार्किंगची व्यवस्था निर्माण होईल.

दोन्ही प्रसाव राबविल्यास नवीन पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील परिसरातील सुरक्षितता वाहतूक व्यवस्यापनात तक्षनीय सुधारणा होईल, असा विश्वास आहे. आपण या मागण्यांची तातडीने दखत पेऊन योग्य ही कार्यवाही करावी अशी विनंतीचे निवेदन ॲड शिवानी घरत यांनी दिले आहे.

# पाणी परिषदेला शिवदास कांबळेंचा पाठिंबा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आयोजित पाणी परिषद घेण्याच्या धोरणाला माजी नगरसेवक शिवदास कांबळे यांनी पाठिंबा दिला असून यासंबंधीचे पत्र त्यांनी महापौर नितीन पाटील यांना सुपूर्द केले.

यानिवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पनवेल शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आपण उचललेली पावले अभिनंदन आणि स्तुत्य आहेत ज्याद्वारे पनवेल मधील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी मदत व्हावी म्हणून तातडीने पनवेलचे कर्तव्यदक्ष आमदार प्रशांत ठाकूर साहेब यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकाची न्हावा शेवा पाणीपुरवठा योजना (टप्पा क्रमांक ३)चा पाठपुरावा करून मार्गी लावण्यासाठी आढावा बैठक घेतली. त्यानुसार त्यामध्ये असलेला शासकीय त्याचबरोबर जमीन अधिग्रहण किंवा नागरिकांकडून होत असलेल्या अडथळ्यांबाबत त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी व सोडवण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेप्रमाणे आपल्या सहकारी नगरसेवकांवरती जबाबदारी सोपवणे म्हणजे सामान्यांनी आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ करणारी घटना आहे त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार.

याचबरोबर या विषयावरती आपण पाणी परिषद घेणार आहात हे ऐकून मनस्वी आनंद झाला की या आणि परिषदेद्वारे सर्वसामान्य जनतेला सामावुन घेऊन त्याची व्याप्ती वाढवावी व त्याद्वारे पाण्याचे महत्व पाण्याचा गैरवापर पाण्याचा योग्य वापर पाण्याचे पुनर्निर्माण बाबींमध्ये नागरिकांना दक्ष ठेवून आदर्श पनवेलच्या कल्पनेमध्ये अभिप्रेत पाणीपुरवठा निरंतर सुरळीत पनवेलकरांसाठी उपलब्ध होईल असे त्यांनी म्हटले.

# मोहोपाडा येथे शिलाई प्रशिक्षणास सुरुवात



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा आणि अल्केल अमाईंन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायतीच्या शिवांजली इमारतीच्या सभामंडपात महिला सक्षमीकरण करिता शिलाई प्रशिक्षणास सोमवार, २० एप्रिलपासून सुरुवात करण्यात आली आहे. शिलाई काम शिकून महिला आपल्या स्वताःचा रोजगार उपलब्ध करू शकतील असे प्रशिक्षण देताना सांगण्यात आले. प्रशिक्षण पुर्ण करणाऱ्या सहा महिलांना मोफत शिलाई मशीन देण्यात येणार आहे. महिला सक्षमीकरण करण्याचा उपक्रमाचे महिला वर्गातून कौतुक होत आहे.

# मानवता फाउंडेशनकडून खारघर आदिवासी पाड्यावर 'अन्नदानम'

**कळंबोली, पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील मानवता फाउंडेशन हा सामाजिक उपक्रमातून सामाजिक हित जपणारा एक फाउंडेशन आहे.दरवर्षी समाजातील गोरगरीब, गरजू व दिन दुबळ्या वंचित घटकापर्यंत सामाजिक सेवा पोचवण्याचा ते प्रयत्न करीत असतात.या वर्षी अक्षय तृतीयाचे निमित्ताने अन्नदान उपक्रमांतर्गत अन्नदान व सामाजिक सेवा देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला आदिवासी बांधवांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.



मानवता फाउंडेशनकडून 'अन्नदानम' प्रोजेक्ट मार्फत खारघर आदिवासी पाड्यावर आदिवासी बांधवाना अन्नदान करण्यात आले. त्या वेळी मानवता फाउंडेशन चे अध्यक्ष संजय पवार, उपाध्यक्ष विनोद नायर, विकी मेगणी टिपू पटवेगर, चेतन कदम, नंदनी सिंग, तुषार डीकुळे, आफताब आलम, विघ्नेश नारायांकर, सुरज।दुबे, रोहन परदेशी आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# वोकेशनल एक्सलन्स अवॉर्डने चंद्रकांत घोसाळकर सन्मानित



**कळंबोली : बातमीदार**

सुधागड तालुक्यातील पाच्छापुर वनवासी बहुल क्षेत्रात उल्लेखनीय सामाजिक शैक्षणिक सार्वजनिक अन सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या वतीने सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष चंद्रकांत उर्फ दादा घोसाळकर यांना वोकेशनल एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संतोष मराठे, असिस्टंट गव्हर्नर सुरेश शेडगे, रोटरीचे पदाधिकारी डॉ.दीपक पुरोहित, डॉ. शैलेश पालेकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष स्मिता मंडलिक सेक्रेटरी डॉ. अरविंद कुलकर्णी, मुख्याध्यापक दीपक उत्तम माळी, सुधागड तालुक्यातील भाजपचे रोहन दगडे तसेच घोसाळकरांचे कुटुंबीय उपस्थित होते.



**पनवेल : भाजप ओबीसी सेल कोकण विभाग सह-संयोजिका सुहासनी केकाणे यांची कन्या डॉ. सोनिया केकाणे-शितोळे आणि जावई डॉ. गोपाळ शितोळे यांनी पनवेल येथील बालाजी बँक्वेट हॉल येथे नव्याने सुरू केलेल्या श्री स्वामी समर्थ डेंटल क्लिनिकचे उद्घाटन भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या सोहळ्याला भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, भरतशेठ ठाकूर, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, नगरसेविका रूचिता लोंढे, माजी नगरसेविका नीता माळी, निलेश नलावडे आदी उपस्थित होते.**



**खारघर : नवी मुंई बंगाली असोसिएशनने हाती घेतलेल्या भालोबासा या महत्त्वाकांक्षी वृद्धाश्रम प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा रविवारी खारघर येथे झाला. सेक्टर ११ येथील भूखंड क्रमांक ७२-जी येथे आयोजित या विशेष कार्यक्रमाला भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. ज्येष्ठ नागरिकांसाठी हक्काचे आणि प्रेमळ निवासस्थान निर्माण करण्याच्या या उपक्रमाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले. यावेळी भाजपचे जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, अमर उपाध्याय, विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षा शर्मिला सरकार, रेव्हरंड फादर एस. अल्मेडा, फादर पीटर आदी उपस्थित होते.**

# उरणमध्ये मिलिंद ठाकूर यांच्यातर्फे 'रंगोत्सव'

**उरण : प्रतिनिधी**

उरण येथील 'योशिता आर्ट' आणि 'मथुरा महादेव एज्युकेशन सेंटर' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय 'रंगोत्सव २०२६' कॅनव्हास पेंटिंग कार्यशाळेचा समारोप जेएनपीए अधिकारी क्लब येथे एका ऐतिहासिक कला प्रदर्शनाने झाला. या सोहळ्यात चिमुकल्या हातांनी साकारलेल्या रंगांच्या किमयासोबतच, शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग यश संपादन करणाऱ्या कन्यांचाही गौरव करण्यात आला.



कार्यक्रमादरम्यान उपस्थितांशी संवाद साधताना प्रसिद्ध चित्रकार मिलिंद ठाकूर यांनी या उपक्रमामागची आपली सामाजिक भूमिका अत्यंत प्रभावीपणे मांडली. ते म्हणाले की, "आजचा विद्यार्थी मोबाईलच्या आभासी दुनियेत स्वतःला हरवून बसला आहे. या अतिवापरामुळे मुलांमधील उपजत कलागुण आणि कौशल्यांचा त्यांना विसर पडत असून, अनेक विद्यार्थी मानसिक तणावाखाली वावरत आहेत. या धोक्यापासून विद्यार्थ्यांना वाचवण्यासाठी, त्यांना मानसिक बळ देण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी 'रंगोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले असल्याचे म्हटले.

प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये नवनिर्मितीची ताकद असते, ती बाहेर काढून कॅनव्हासवर मांडण्याची संधी देणे हाच आमचा मुख्य हेतू असून हा क्षण पालकांसाठी अत्यंत अभिमानास्पद आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. या सर्व मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी चित्रकार मिलिंद ठाकूर यांनी राबवलेला हा उपक्रम उरण परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.



**पनवेल : कराडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किरण माळी यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, प्रवीण काळबागे आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# चेहरा आणि मुखवटा

संसदेने २०२३ ला घेतलेल्या निर्णयाप्रमाणे, २०११ च्या जनगणनेनुसार डिलिमिटेशन करून कोणत्याही स्थितीत २०२९ ला महिला आरक्षण विधेयक लागू करावे आणि २०२९ ला सर्वाधिक संख्येने संसदेत महिला निवडून येतील अशा शुद्ध भावनेने महिला आरक्षण विधेयकाची रचना करण्यात आली होती.

**घटनादुरुस्ती विधेयकाच्या मंजुरीसाठी दोन तृतीयांश बहुमताचा आकडा गाठणारे संख्याबळ सत्ताधाऱ्यांकडे नाही याचा फायदा घेऊन केवळ राजकीय कुरघोडी करण्यासाठी काँग्रेस आणि इंडिया आघाडीने महिला आरक्षणासाठीच्या घटनादुरुस्ती विधेयकाचा मोदी सरकारचा प्रामाणिक प्रयत्न हाणून पाडला, आणि तब्बल आठ दशकांपासून सुरू असलेल्या एका प्रतीक्षेचीच भ्रूणहत्या केली. सोमवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत विरोधकांच्या या राजकारणाचा मुखवटा टराटरा फाडताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंडिया आघाडीवर ठेवलेला भ्रूणहत्येच्या पातकाचा ठपका पूर्णपणे समर्थनीय ठरतो. महाराष्ट्रात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे गटदेखील भ्रूणहत्येच्या या पातकात सहभागी झाल्यामुळे भाजपाप्रणित महायुतीच्या वतीने येत्या काही दिवसांत इंडिया आघाडीविरोधात होणाऱ्या निषेध आंदोलनांच्या झळा त्यांनादेखील सोसाव्या लागणार आहेत. महिला आरक्षण विधेयक हे डिलिमिटेशन व जनगणनेप्रमाणे लागू होईल हे संसदेत ज्या विरोधकांनी 2023 साली मान्य केले होते, त्यांनीच आता सरड्यासारखा रंग बदलला, आणि विधेयकाच्या विरोधात मतदान करून विधेयक नामंजूर केले. केवळ राजकीय हेतूने व सरकारवर कुरघोडी करण्याच्या विरोधकांच्या प्रतिगामी मानसिकतेतून लोकसभेतील महिलांच्या सहभागाच्या हक्कांचा मृत्यू झाला हे खरेच, पण यामुळे देशातील नारीशक्तीचादेखील घोर अपमान झाला आहे. अशा प्रकारे महिलांच्या अधिकारांची हत्या होत असेल, तर विरोधक गुडघे टेकून महिलांच्या हक्कांबाबत मान्यता देतील, असा अभूतपूर्व जनमताचा रेटा उभा केला जाईल, असेही त्यांनी जाहीर केले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने केवळ भाषणबाजीचे राजकारण करणाऱ्या विरोधकांनी त्यांचा आचार आणि ज्योतिबांचे महिलांच्या प्रगतीबाबतचे विचार यांतील तफावत दाखवून दिल्याने त्यांचे खरे चेहरे आता उघडे पडले आहेत. देशाच्या प्रगतीत महत्वाचा वाटा उचलणाऱ्या महिलांना त्यांचा हक्क बहाल करण्याबाबत याआधीही काँग्रेसने सातत्याने महिलाविरोधी भूमिका घेतली आहे. शाहबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बदलून काँग्रेसने आपली मानसिकता दाखवून दिली होती. वर्षानुवर्षे काँग्रेसची सत्ता असलेल्या एकाही राज्यात महिलेला मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली नाही. याच मानसिकतेचे दर्शन काँग्रेसच्या या राजकारणातून पुन्हा एकदा घडले असून महाराष्ट्रात पुरोगामीत्वाचा डिंडिम वाजविणाऱ्या व महिला सबलीकरणाच्या धोरणाचे श्रेय घेणाऱ्या शरद पवार यांच्या पक्षानेही त्याच राजकारणाचे भागीदार व्हावे ही बाब दुर्दैवी म्हणावी लागेल. आता महिलांच्या हक्काचा हा संघर्ष नव्या उमेदीने सुरू होईल तेव्हा त्याच्या दबावामुळे तरी महिलांच्या हक्काचे आरक्षण बहाल करण्यास विरोधकांच्या इंडिया आघाडीला भाग पडेल, अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. केवळ महिला आरक्षणापुरताच हा मुद्दा मर्यादित नाही. हे विधेयक बहुमताने संमत झाले असते, तर लोकसभा आणि विधानसभांमधील एकूण जागा वाढल्याने अनुसूचित जातीजमातींचे प्रतिनिधित्वदेखील वाढले असते, आणि सहाजिकच या वर्गातील महिलांनाही सहभागाची संधी मिळाली असती. काँग्रेसच्या राजकारणामुळे या समाजाला व या समाजघटकातील महिलांना प्रतिनिधित्वाची संधी नाकारली गेली आहे. राजकारणाचे रंग सतत बदलत असतात. इंडिया आघाडीच्या चेहऱ्यावरील महिलाद्वेषाचे खरे रंग अधिक गडद झाले असून या चेहऱ्यानिशी त्यांना आता जनतेस सामोरे जावे लागणार आहे.**

# वरदविनायक महिला स्वयंसहायता समूह बचतगट





अलिबाग तालुक्यातील वरदविनायक महिला स्वयंसहायता समूहाला दि.२७ मार्च २०१८ रोजी रुपये १५ हजारचा फिरता निधी मिळाला. समुहातील प्रत्येक महिलेने २ टक्के व्याजाने निधी वाटून घेतला व त्याची नियमीत परतफेड करुन समुहाला फायदा करुन घेतला. नंतर या समुहाला १ लाखाचे कर्ज मिळाले त्या कर्जाचा वापर समुहातील महिलांनी मसाले, विविध प्रकारचे सरबते करण्यासाठी केला.

समुहाच्या अध्यक्ष स्मिता वैद्य यांनी मिनाकारी वर्कचे प्रशिक्षण घेवून समुहातील इतर महिलांनाही त्याचे प्रशिक्षण दिले. त्याप्रमाणे समुहातील महिलांनी मेहनतीने तांब्याच्या वस्तूंवत मिनाकारी शिकून ते विकून स्वतःचा तसेच समूहाचा आर्थिक स्तर उंचावला. समुहाने रायगड सरस २०१७–१८ मध्ये सहभाग घेतला. कोकण सरस २०१९ मध्ये समुहाला व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच समुहाने महालक्ष्मी सरस २०१७–१८ व २०१८–१९ मध्ये सहभाग नोंदविला आहे.

वरदविनायक महिला स्वयंसहायता समूह बचत गट भायमाला, कामार्ले गटातील एकूण सदस्य संख्या –१० असून यातील दारिद्रय रेषेखालील सदस्य संख्या ७ आहे. तर पी.आय.पी. सदस्य संख्या ३ आहे. गटातील सदस्य बचत दरमहा १०० रुपये असून दर आठवडी बचत २५ रुपये आहे. या समूहाकरिता उपलब्ध बाजारपेठ अलिबाग १० कि.मी., पोयनाड–७ कि.मी. इतके अंतर आहे. जिल्ह्याचे व तालुक्याचे ठिकाण अलिबाग, प्राथमिक आरोग्य केंद्र –पेझारी, गावात शेती– खराब व रब्बी हंगामात, प्रमुख पिक– तांदगावातील मुख्य उत्पनाचस्रोत–शेती, गावातील महिलांचा मुख्य व्यवसाय–शेती मोलमजुरी, गावाच्या विकासाचा मुख्य घटक–अलिबाग–मुंबई महामार्ग, गाव नजदिकच्या बँक– बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गटाचा व्यवसाय–कॉपर मीना वर्क, मसाले, लोणचे जूस असा आहे.

या स्वयंसहायता समूहाने रायगड सरस, कोकण सरस, अति महालक्ष्मी सरस,महालक्ष्मी सरस, घे भरारी EALITY SHOW मध्ये विक्री व प्रदर्शनात सहभाग नोंदवला आहे.

**भविष्यातील वाटचाल**

वरदविनायक महिला स्वयंसहायता समूह, पुगाव रोहा हा समूह भविष्यात समूहाचे आउटलेट तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे. अलिबाग, मुंबई महामार्गाचाही चांगला उपयोग विपणनासाठी करण्याचे नियोजन आहे. यासाठी आम्ही जिल्हा स्तरावरून प्रयत्नशील आहोत .समूहाचा मसाला, जूस, लोणचे, कोकण मसाले सध्या अलिबाग व रायगड जिल्ह्यातील आउटलेट मध्ये सध्या स्वयंसहायता समूहाचे प्रॉडक्ट डिस्ट्रीबुट केले जाते. भविष्यात गटाच्या नावाने उमेद अभियानाचे आउटलेट अलिबाग येथे जिल्हा स्तरावरून चालू करण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले व प्रकल्प संचालिका श्रीमती प्रियदर्शनी मोरे यांचे बहुमूल्य असे मार्गदर्शन लाभले.

**–मनोज सानप**
जिल्हा माहिती अधिकारी
रायगड–अलिबाग

# गणितज्ज्ञ शकुंतला देवी

शकुंतला देवी यांचा आज स्मृतिदिन. शकुंतला देवी यांना ह्यूमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बंगलोरमध्ये झाला. त्यांचे कुटुंब म्हणजे पारपंरिक कन्नड ब्राह्मण, पण शकुंतला देवी यांचे वडील नव्या युगातले. त्यांनी आपल्या भिक्षुकीच्या पारंपरिक व्यवसायाला आणि मंदिरातील परंपरागत पुजारी होण्याला नकार देऊन सर्कसमधील आडवाटेवरची नोकरी धरली.

शकुंतला देवींचे वडील सर्कसमध्ये काम करीत होते. शकुंतला तीन वर्षांच्या असताना त्यांना पत्त्यांचे खेळ शिकवताना त्यांच्या अफाट स्मरणशक्तीचे ज्ञान वडिलांना झाले. त्यांनाच शकुंतला देवी यांच्यामधील झपाट्याने गुणाकार–भागाकार करण्याच्या शक्तीची पहिल्यांदा ओळख पटली. सर्कस सोडून ते शकुंतला यांचेच रोडशो करू लागले. वयाच्या ६व्या वर्षी शकुंतला यांनी म्हैसूर विद्यापीठात आपल्या अंकगणितीय कौशल्याचे प्रदर्शन केले.



शकुंतला देवी १९४४मध्ये लंडनला गेल्या. लंडनला गेल्यावर पुढे त्यांनी संपूर्ण जगामध्ये प्रवास केला आणि आपल्या बुद्धिमत्ता आणि गणितीय कौशल्याचे वेगवेगळे चमत्कार दाखवून त्यांनी संपूर्ण जगाला चक्रावून सोडले. १९७६मध्ये आपल्या अमेरिका दौर्यात त्यांनी संगणकापेक्षा अधिक वेगाने आकडेमोड पूर्ण करून त्याची उत्तरे परीक्षकांसमोर अचूक सादर केली.


१९७७मध्ये डलास विद्यापीठात शकुंतला यांचा मुकाबला तत्कालीन सर्वांत जलद कॉम्प्यूटर 'युनिव्हॅक'शी झाला. तेथे शकुंतला देवी यांनी एका २०१ अंकी संख्येचे २३वे मूळ ५० सेकंदात काढले व फळ्यावर लिहिले. हे मूळ काढायला कॉम्प्युटरला ६२ सेकंद लागले.

१८ जून १९८०मध्ये त्यांना ७६८६३६९७७४८७० आणि २४६५०९९७४५७७९ या दोन संख्या गुणाकारासाठी देण्यात आल्या. हे आकडे लंडनच्या इम्पीरियल कॉलेजच्या संगणक विभागाने निवडलेले होते. शकुंतला देवी यांनी या दोन आकड्यांचा अचूक गुणाकार करून दाखवत केवळ २८ सेकंदामध्ये १८९४७६६८१७७९९५४२६४६२७७३७३० हे उत्तर दिले. १३ आकडी दोन संख्यांचा गुणाकार त्यांनी फक्त २८ सेकंदात पूर्ण केला. त्यांच्या याच कामगिरीमुळे त्यांना ह्युमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि शकुंतला देवी यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये विराजमान झाले.

शकुंतला देवी यांच्या अंगी एक अद्भूत प्रतिभा होती. अख्ख्या भारतास त्याची दखल घ्यावी लागली. गुगलने त्यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त डुडल बनवून त्यांना आदरांजली वाहिली होती. भारतात परतल्यावर १९८८मध्ये त्यांना अमेरिकेतून बर्कलेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठामधील मानसशास्त्र विभागाचे विशेष आमंत्रण आले. या विभागातील प्रा. आर्थर जेनसन यांनी त्यांच्यावर संशोधन करण्यास सुरुवात केली. यांनी देखील त्यांच्यावर असंख्य प्रयोग केले. कोणत्याही अवघड बहुअंकी संख्येचे घनमूळ काढणे किंवा कोणत्याही बहुअंकी संख्येचा सातवा किवा आठवा घात काढायला सांगण्याची खोटी की शकुंतला देवी यांचे उत्तर तयार असायचे. अशा या महान गणितज्ज्ञाचे २१ एप्रिल २०१३ रोजी निधन झाले. (साभार – इंटरनेट)







## ॲडोबने स्टुडंट स्पेसेस प्लॅटफॉर्म केले लॉन्च

एआयआता विद्यार्थ्यांसाठी एक वैयक्तिक शिक्षक बनले आहे. ॲडोब ॲक्रोबॅट आणि गुगल जेमिनीने अलीकडेच अशी अभ्यास वैशिष्ट्ये सादर केली आहेत, जी अभ्यासाच्या पारंपरिक पद्धतीला पूर्णपणे बदलत आहेत. जिथे ॲडोब विद्यार्थ्यांना नोट्समधून काही सेकंदात पॉडकास्ट आणि फ्लॅशकार्ड्स बनवण्याची सुविधा देत आहे, तिथे गुगल भारताच्या नीट विद्यार्थ्यांसाठी मोफत मॉक टेस्ट घेऊन आले आहे. गुगलने फिलिक्सवाला आणि इतर मोठ्या अभ्यास प्लॅटफॉर्म्ससोबत भागीदारी केली आहे. जाणून घेऊया तुम्ही ही वैशिष्ट्ये कशी वापरू शकता.

**ॲडोब ॲक्रोबॅटः** ही चार वैशिष्ट्ये अभ्यासात उपयुक्त

**समरी जनरेटरः** या टूलवर सर्वात आधी पूर्ण पीडीएफ अपलोड करा. एआय २ मिनिटांत त्याचे मुख्य मुद्दे सांगते की संघर्षाची सुरुवात कधी झाली आणि सध्याची परिस्थिती काय आहे.

**स्टडी गाईड्सः** या टूलमुळे 'अणु करार' आणि 'आर्थिक निर्बंध' यांसारख्या मुख्य विषयांचे माईंड मॅप तयार होतात, ज्यामुळे संपूर्ण पार्श्वभूमी समजून येते.

**एआय ट्यूटरः** कोणतीही तांत्रिक गोष्ट समजत नसेल तर एआय ट्यूटरला विचारा '१० वर्षांच्या मुलाला समजेल अशा प्रकारे समजावून सांगा.' मग भाषा सोपी होईल.


**एआय पॉडकास्टः** तुम्ही तुमच्या नोट्स 'पॉडकास्ट' मोडमध्ये टाकू शकता. तुम्ही बाहेर असाल तरीही या संघर्षावरील चर्चा ऐकू शकता... ज्यामुळे उजळणी सोपी होईल.

**स्टुडंट स्पेसेस' सह स्मार्ट अभ्यास**

अडोबने विद्यार्थ्यांसाठी स्टुडंट स्पेसेस लॉंच केले आहे. हे टूल पीडीएफ फाइल्स आणि नोट्सना इंटरॅक्टिव्ह स्टडी मटेरियलमध्ये रूपांतरित करते. यात विद्यार्थ्यांसाठी ८ टूल्स आहेत. समजा, यूएस–इराण संघर्षावर तुमच्याकडे १०० पानांची पीडीएफ फाइल आहे. तुम्ही टूलचा वापर असा करू शकता.

गुगल जेमिनी–नीट आणि यूजीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत मॉक टेस्ट गुगलने विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन जेमिनी एआयमध्ये नीट यूजीसाठी मोफत मॉक टेस्ट फीचर रोलआउट केले आहे. नीट परीक्षा ३ मे रोजी असल्याने, हे विद्यार्थ्यांच्या तयारीला मदत करेल.

# भारतीय नागरी सेवा दिन विशेष



**निमित्त**

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी २१ एप्रिल १९४७ रोजी दिल्लीतील मेटकाफ हाऊसमध्ये नागरी सेवकांच्या पहिल्या गटाला संबोधित केले होते. त्या दिवसाची आठवण म्हणून २००६ पासून हा दिवस नागरी सेवा दिन म्हणून नियमितपणे साजरा होत आहे.

दरवर्षी २१ एप्रिल रोजी भारतामध्ये नागरी सेवा दिन पाळला जातो. प्रशासकीय सेवेत स्वतःला सार्वजनिक सेवेसाठी समर्पित असलेल्या लोकांच्या सन्मानार्थ हा दिन साजरा केला जातो. भारतीय नागरी सेवेचे दोन भाग आहेत. पहिला अखिल भारतीय सेवा. यात तीन सेवा आहेत. भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय पोलीस सेवा (आयपीएस), भारतीय वनसेवा (आयएफओए). दुसरा भाग केंद्रीय सेवा. यात गट अ व गट ब यात विभागलेल्या सुमारे १७ सेवा येतात. उदा. राजस्व सेवा, पोस्टल सेवा, माहिती सेवा, व्यापार सेवा इ. नागरी सेवा दिनाचा एक भाग म्हणून दरवर्षी पंतप्रधानांच्या हस्ते सार्वजनिक प्रशासनात उत्कृष्टतेसाठी पारितोषिके नागरी सेवकांना देण्यात येतात.

भारतीय प्रशासकीय सेवा ही भारत सरकारची नागरी सेवा आहे. आयएएस ही तीन अखिल भारतीय सेवांपैकी एक आहे (भारतीय पोलीस सेवा व भारतीय वन सेवा या इतर दोन सेवा आहेत). आयएएसला भारताच्या लोकप्रशासनामध्ये असाधारण महत्त्व आहे. केंद्रीय सरकारच्या व राज्य सरकारांच्या नागरी रचनेत बरीच महत्त्वाची पदे आयएएस अधिकारी सांभाळतात.


आयएएस अधिकाऱ्यांची निवड नागरी सेवा परीक्षेद्वारा केली जाते. संघ लोक सेवा आयोग ही भारत सरकारची संविधानिक संस्था सरकारी अधिकाऱ्यांची निवड व नियुक्ती करण्यास जबाबदार आहे. आयएएस अधिकारी बनण्यासाठी इच्छुक उमेदवारांना नागरी सेवा परीक्षेचे प्राथमिक परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत हे तीन भाग पूर्ण करावे लागतात.

आयकर अधिकारी, राजदूत व परराष्ट्र सचिव, केंद्र सरकारच्या विविध खात्यांतील सल्लागार, जिल्हाधिकारी, निवडणूक अधिकारी अशी काही प्रमुख पदे आयएएस अधिकारी भूषवितात. या सेवेमध्ये रुजू होण्यासाठीची परीक्षा भारतातील केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतली जाते.

केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा संघ लोकसेवा आयोग ही भारत संघ राज्याची निवड संस्था आहे. ही संस्था अखिल भारतीय सेवा तसेच संघ सेवेच्या गट 'अ' व गट 'ब' कर्मचाऱ्यांच्या निवडीकरिता जबाबदार आहे. हा आयोग 'कर्मचारी, लोक तक्रारी आणि निर्वाहभत्ता मंत्रालयातील' 'कर्मचारी आणि प्रशिक्षण विभाग' यांच्या अधिपत्याखाली येतो. हा संवैधानिक आयोग आहे.

भारत सरकार संघ सेवेतील तसेच अखिल भारतीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या नेमणूक, बदली, पदोन्नती व शिस्तीची कारवाई इ.करिता लोक सेवा आयोगाशी सल्लामसलत करते. हा आयोग थेट राष्ट्रपतींना अहवाल साधार करतो. 'लोकसेवा आयोग' या नावाने १ऑक्टोबर १९२६रोजी स्थापना. नंतर भारत सरकार कायदा १९३५ नुसार 'फेड्रल संघराज्य लोकसेवा आयोग' असे नामकरण आणि शेवटी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'संघलोकसेवा आयोग' असे नाव बदल झालेले आहेत. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## मेंदूचे कार्य सुधारण्यासाठी सहा उपाय ठरतील उपयुक्त

शरीराच्या इतर अवयवांप्रमाणे मेंदूला योग्य काळजी आणि व्यायामाची आवश्यकता असते. म्हणून दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलमधील अंतर्गत औषधांचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंघला यांनी सांगितले की, जीवनशैलीतील बदल, मानसिक व्यायाम आणि निरोगी सवयींच्या संयोजनाद्वारे मेंदूचे कार्य सुधारता येते.



मेंदूच्या आरोग्यासाठी नियमित व्यायाम आवश्यक आहे, कारण तो रक्त प्रवाह सुधारतो, संज्ञानात्मक कार्य वाढवतो आणि न्यूरोप्लास्टीसिटीला प्रोत्साहन देतो. आठवड्यातून अनेक वेळा चालणे, सायकलिंग किंवा पोहणे यांसारख्या मध्यम–तीव्रतेचा व्यायाम किमान २०–३० मिनिटे केल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढू शकते.

मानसिकदृष्ट्या सक्रिय राहणेदेखील वाचन, कोडी सोडवणे किंवा नवनवीन गोष्टी शिकणे यांसारखे क्रियाकलाप मदत करतात, ज्यामुळे वयाशी संबंधित संज्ञानात्मक घट होण्याचा धोका कमी होतो.

**मेंदूच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी हे करा**

ग्लेनीगल्स हॉस्पिटल, परळ, मुंबई येथील न्यूरोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पंकज अग्रवाल यांनी माहिती दिली...

**रात्रीची पुरेशी झोप घ्या :** प्रत्येकाने दररोज सात–आठ तासांची झोप घेतली पाहिजे, जेणेकरून त्याचा मेंदू विश्रांती घेईल आणि तो पुन्हा स्थिर होईल.

**शारीरिकदृष्ट्या सक्रिय रहा :** नियमित व्यायाम केल्याने मेंदूमध्ये रक्त प्रवाह वाढेल आणि स्मरणशक्ती सुधारेल.

**मेंदूला चालना देणारे पदार्थ खा :** संतुलित आहार घेणे आवश्यक आहे. तुमच्या जेवणात मासे, काजू, बेरी, पालेभाज्या आणि संपूर्ण धान्ये यांचा समावेश करा. जंक, प्रक्रिया केलेले, तेलकट पदार्थ टाळा. फळं, भाज्या, संपूर्ण धान्य अशा प्रकारचा संतुलित आहार घेतल्यास मेंदूच्या आरोग्यास आवश्यक पोषक तत्वे व अँटीऑक्सिडंट्स मिळतात.

**मन सक्रिय ठेवा :** कोडी सोडवा, पुस्तके वाचा, काहीतरी नवीन शिका किंवा मेंदूचे खेळ खेळा. नवीन भाषा, नृत्य किंवा फोटोग्राफी यांसारखे नवीन कौशल्य शिकण्याचा प्रयत्न करा.

**सामाजिकदृष्ट्या जोडलेले रहा :** मित्र आणि कुटुंबाशी बोलल्याने तुमचे मन प्रसन्न राहते आणि ताण कमी होतो. तुमच्या मित्रांना तुमच्या भावना मोकळेपणाने सांगा.

**ताण कमी करा :** मेंदूचे आरोग्य वाढवण्यासाठी दीर्घ श्वास घेऊन ध्यान करणे किंवा योगासने करा.

# उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालय,

## भुमिसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत

## कलम १९ ची अधिसुचना

याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (३) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (३) नुसार जमिन संपादन करणे आवश्यक असल्याने भुमिसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ याची कलमे ४ ते १५ यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपध्दती अशा जमिनीच्या संबंधात लागू होणार नाही.

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची–एक

### जमिनीचे वर्णन

**गाव :– धरणाकॅम्प, तालुका :– पनवेल, जिल्हा :– रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (हे.आर.चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १ | ०१.०६८४ |
| २ | २/क पै. | ०.३८८३ |
| ३ | २१ | ०.३७५२ |
| ४ | १९/२५ पै. | ०.०९३१ |
| ५ | १९/२६ पै. | ०.०४२३ |
| | **एकुण** | **०१.९६७३** |

**गाव :– पिसार्वे, तालुका :– पनवेल, जिल्हाः– रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | २० | ०.४७६२ |
| २ | २३ | ०.२८३० |
| ३ | २४ | ०.०९६५ |
| ४ | २९ | ०.०४८८ |
| ५ | ३१ | ०.०७९६ |
| ६ | ३४/१/२/अ | ०.२५३२ |
| ७ | ३४/१/२/ब | ०.१०२८ |
| ८ | ३४/३अ | ०.००१७ |
| ९ | ३७/३+४अ पै | ०.०९८७ |
| १० | ३७/४ब पै | ०.१५१८ |
| ११ | ३७/६ | ०.०२५३ |
| १२ | ३७/७ | ०.११९० |
| १३ | ३७/८ | ०.०४३८ |
| १४ | ३७/९ | ०.०००६ |
| १५ | ३७/१० | ०.११६७ |
| १६ | ३७/११ | ०.०३०० |
| १७ | ३८ | ०.०३२६ |
| | **एकुण** | **०१.९६०३** |

**गाव :– तुर्भे, तालुका :– पनवेल, जिल्हाः– रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १७/४ | ०.००२४ |
| २ | १७/५ | ०.०७०६ |
| ३ | १७/६ | ०.०८५४ |
| ४ | ८१/५१ | ०.०५७७ |
| ५ | ८१/५० | ०.०१५० |
| ६ | ८१/४५ | ०.२९७१ |
| ७ | ८१/४४+४६+४९ | ०.०३११ |
| ८ | ८२ | ०.२८०० |
| ९ | ७५ | ०.००८६ |
| १० | ७४/१ | ०.०६५४ |
| ११ | ७४/२ | ०.१३१३ |
| १२ | ७४/३ | ०.११२० |
| १३ | ७४/४ | ०.१२१० |
| | **एकुण** | **०१.२७७६** |

### अनुसूची–दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**अधिसूचना :– प्रकल्पाचे नाव :–** पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे धरणाकॅम्प, पिसार्वे व तुर्भे, एकूण क्षेत्र **५.२०५२ चौ.मी**. येथील मौजे धरणाकॅम्प, ता.पनवेल येथील स.नं.१ पासून ते मौजे तुर्भे, ता. पनवेल येथील स.नं.८३ पर्यंतचा अंबरनाथ–कुळगांव बदलापुर व परिसर अधिसूचित विकास योजनेत दर्शविलेल्या ३०.०० मी. रुंदीच्या आखणीमध्ये बदल करण्यात आलेल्या रस्त्याने बाधित भूखंडाचे भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**निर्गमित :– प्रकल्प कार्याचे वर्णन :–** पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे धरणाकॅम्प, पिसार्वे व तुर्भे, एकूण **क्षेत्र ५.२०५२ चौ.मी** येथील मौजे – धरणाकॅम्प, ता.पनवेल येथील स.नं.१ पासून ते मौजे तुर्भे, ता. पनवेल येथील स.नं.८३ पर्यंतचा अंबरनाथ–कुळगांव बदलापुर व परिसर अधिसूचित विकास योजनेत दर्शविलेल्या ३०.०० मी. रुंदीच्या आखणीमध्ये बदल करण्यात आलेल्या रस्त्याने बाधित भूखंडाचे भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**करण्यापूर्वी :–समाजाला मिळणारे लाभः–** पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

### अनुसूची–तीन

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग :– पाडणारी कारणे** निरंक

### अनुसूची–चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :–** पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे धरणाकॅम्प, पिसार्वे व –तुर्भे, एकूण **क्षेत्र ५. २०५२ चौ. मी** येथील मौजे – धरणाकॅम्प, ता.पनवेल येथील स.नं. १ पासून ते मौजे – तुर्भे, ता. पनवेल येथील स.नं.८३ पर्यंतचा अंबरनाथ– कुळगांव बदलापुर व परिसर अधिसूचित विकास योजनेत दर्शविलेल्या ३०.०० मी. रुंदीच्या आखणीमध्ये बदल करण्यात आलेल्या रस्त्याने बाधित भूखंडाचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे. या जमिनी संपादन करण्यामुळे केवळ ३५ खातेदार बाधीत होत आहेत व खातेदार विस्थापित होत नाही. पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदींनुसार सामाजिक परिणाम निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही. सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

टिप :– उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.
ठिकाण :– पनवेल
दिनांक :– १३/०४/२०२६

सही/–
**(पवन चांडक)**
उप विभागीय अधिकारी पनवेल
उप विभाग पनवेल

# BY THE SUB DIVISIONAL OFFICER PANVEL, SUB DIVISION PANVEL

## NOTIFICATION OF SECTION 19 UNDER RIGHT TO GET APPROPRIATE COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION, RESETTLEMENT ACT 2013

Accordingly, the District Magistrate of Raigad District, having good governance, has enacted the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (2013). In exercise of the powers conferred by sub-section (1) of section 13 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") and section 126 (3) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") Land described in more detail in Schedule One hereto annexed is required or is likely to be required for the public purposes specified in more detail in Schedule Two;

And whereas, since the acquisition of land is necessary pursuant to Section 126(3) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the right to receive fair compensation during the process of land acquisition, rehabilitation, and resettlement Furthermore, the procedure specified in Sections 4 to 15 of the Right to Transparency Act, 2013, shall not apply in respect of such land.

And whereas, the District Magistrate of Raigad District, after considering the report, if any, made under sub-section (2) of section 15, is satisfied that the said land needs to be modified for the said public purpose; and therefore, under the said Act, It is hereby declared that the said land is required for the said public purpose in terms of sub-section (1) of section 19.

And whereby the areas described in more detail in Schedule III are designated as Rehabilitation Areas for the purpose of rehabilitation and rehabilitation of the affected families, the summary of the Rehabilitation and Resettlement Scheme is specified in Schedule Four

AND WHEREAS, the District Collector under Clause (g) of Section 3 of the said Act is deputing the Suh Divisional Officer Panvel, Sub Division Panvel, (Old Thana Naka) to perform the functions of the Collector under the said Act;

### Schedule-1

### Description of the Land

**Village :- Dharnacamp, Tal.:- Panvel, District :- Raigad**

| Sr.No. | S.No./H.No. 1 | Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 1 | 1 | 01.0684 |
| 2 | 2/C P | 0.3883 |
| 3 | 21 | 0.3752 |
| 4 | 19/25 P | 0.0931 |
| 5 | 19/26 P | 0.0423 |
| | **Total** | **01.9673** |

**Village :- Pisarve, Tal.:- Panvel, District :- Raigad**

| Sr.No. | S.No./H.No. | Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 1 | 20 | 0.4762 |
| 2 | 23 | 0.2830 |
| 3 | 24 | 0.0965 |
| 4 | 29 | 0.0488 |
| 5 | 31 | 0.0796 |
| 6 | 34/1/2/अ | 0.2532 |
| 7 | 34/1/2/ब | 0.1028 |
| 8 | 34/331अ | 0.0017 |
| 9 | 37/3+4अ पै | 0.0987 |
| 10 | 37/4ब पै | 0.1518 |
| 11 | 37/6 | 0.0253 |
| 12 | 37/7 | 0.1190 |
| 13 | 37/8 | 0.0438 |
| 14 | 37/9 | 0.0006 |
| 15 | 37/10 | 0.1167 |
| 16 | 37/11 | 0.0300 |
| 17 | 38 | 0.0326 |
| | **Total** | **01.9603** |

**Village :- Turbhe, Tal.:- Panvel, District :- Raigad**

| Sr.No. | S.No./H.No. | Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 1 | 17/4 | 0.0024 |
| 2 | 17/5 | 0.0706 |
| 3 | 17/6 | 0.0854 |
| 4 | 81/51 | 0.0577 |
| 5 | 81/50 | 0.0150 |
| 6 | 81/45 | 0.2971 |
| 7 | 81/44+46+49 | 0.0311 |
| 8 | 82 | 0.2800 |
| 9 | 75 | 0.0086 |
| 10 | 74/1 | 0.0654 |
| 11 | 74/2 | 0.1313 |
| 12 | 74/3 | 0.1120 |
| 13 | 74/4 | 0.1210 |
| | **Total** | **01.2776** |

### Schedule-II

### Details regarding the nature of the public project

**Notification:- Name of the project:-** Mouje-Dharnacamp, Pisarve and Turbhe within the limits of Panvel Municipal Corporation, total area 5.2052 sq.m. From S.No.1 at Mouje-Dharnacamp, Tal. Panvel to Mouje-Turbhe, Tal. Panvel purpose of land acquisition of the plot affected by the road which has been changed in the design of 30.00 m width as shown in the notified development plan of Ambernath- Kulgaon Badlapur and vicinity up to S.No.83.

**Issued:- Description of Project Work:-** Mouje-Dharnacamp, Pisarve and Turbhe within Panvel Municipal Corporation limits, total area 5.2052 sq.m. From S.No.1 at Mouje-Dharnacamp, Tal. Panvel to Mouje-Turbhe, Tal. Panvel purpose of land acquisition of the plot affected by the road which has been changed in the design of 30.00 m width as shown in the notified development plan of Ambernath-Kulgaon Badlapur and vicinity up to S.No.83.

**Before - Benefits to the society -** Due to the industrial importance and urbanization of Panvel city, as well as its rapid development and expansion, the society will not be able to progress without acquiring the proposed area. Therefore, it is necessary to widen the road for public.

### Schedule-III

**Compelling the displacement of the affected person :** Nil

पान ७ वर..

# पळस्पे येथे ‘शासन आपल्या दारी’

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन पनवेल तहसील कार्यालय अंतर्गत पळस्पे महसूल मंडळाच्या वतीने पळस्पे येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालय, पळस्पे येथे १७ एप्रिल रोजी करण्यात आले. शासन आपल्या दारी या संकल्पनेतून नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश या शिबिरामागे होता.

या कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपजिल्हाधिकारी रायगड जनार्दन कासार व तहसीलदार पनवेल मीनल भोसले भामरे यांच्यासह पळस्पे मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व महसूल कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांसाठी महाविस्तार एआय ॲप नोंदणी व फार्मर आयडी रजिस्ट्रेशन, एसआयआर मॅपिंगद्वारे मतदारांचे नोंदणी व पडताळणी कार्य, मोठ्या प्रमाणावर आधार कार्ड अपडेट सुविधा, नागरिकांसाठी आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, आरोग्य तपासणी व वैद्यकीय सुविधा, कृषी विभाग, रेशन कार्ड व इतर शासकीय योजनांची माहिती व सेवा, एनसीएमसी कार्ड नोंदणी (बस प्रवास सवलतीसाठी), ७/१२ उतारे व इतर महसुली सेवा, विविध प्रकारचे दाखले वाटप करण्यात आले. यावेळी १ हजार २०० नागरिकांना विविध योजनांचा थेट लाभ देण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. मंगेश वाकडीकर यांनी अशा शिबिरांमुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध होत असल्याने वेळ व खर्चाची बचत होत असल्याचे नमूद केले. जनार्दन कासार यांनी महसूल विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे नागरिकांना तात्काळ सेवा मिळत असल्याचे सांगितले.

तहसीलदार मीनल भोसले भामरे यांनी “शासन आपल्या दारी” ही संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी महसूल विभाग कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. पळस्पे मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महाराजस्व समाधान शिबिराचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणीबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

# देशांतर्गत वाहतुकीत नवी मुंबई विमानतळाची झेप

## चार महिन्यांत चार लाख जणांचा प्रवास

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

व्यावसायिक उड्डाणांना सुरुवात झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यांत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने जवळपास चार लाखांचा टप्पा गाठण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. देशांतर्गत विमान वाहतुकीत या विमानतळाने अल्पावधीतच महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे.

ओएजी या जागतिक ट्रॅव्हल डेटा संस्थेच्या आकडेवारीनुसार, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आतापर्यंत तीन लाख ९३ हजार ८१९ प्रवाशांनी प्रवास केला आहे. या प्रवासी संख्येच्या आधारे हा विमानतळ देशातील ९ वा सर्वाधिक व्यग्र देशांतर्गत विमानतळ ठरला आहे. येत्या काही दिवसांत आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू होण्याची शक्यता असल्याने हा आकडा लवकरच चार लाखांच्या पुढे जाणार असल्याचे संकेत आहेत. सध्या या विमानतळावरून दररोज सुमारे १५० उड्डाणे होत असून, आठवड्याला सुमारे ११०० उड्डाणे कार्यरत आहेत.



### ४६ शहरांपर्यंत प्रवास

*मुंबई महानगर प्रदेशातील दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाते. छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल एअरपोर्ट (सीएसएमआयए) वरील वाढता ताण कमी करण्याच्या उद्देशाने या विमानतळाची उभारणी करण्यात आली आहे. अवघ्या चार महिन्यांत देशातील ४६ शहरांपर्यंत प्रवास करणाऱ्या प्रवाशांमुळे हा महत्त्वाचा टप्पा गाठता आल्याचे बोलले जात आहे.*

आंतरराष्ट्रीय सेवा अद्याप सुरू नसतानाही या विमानतळाला प्रवाशांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. या विमानतळाचा पहिला टप्पा सध्या कार्यान्वित असून, त्यात एक धावपट्टी आणि एक टर्मिनल सुरू आहे. दुसऱ्या धावपट्टी आणि इतर टर्मिनल इमारतीच्या कामालाही वेग देण्यात आला आहे.

तसेच सिडको मंडळाने याच विमानतळालगत तिसरी धावपट्टी उभारण्यासंदर्भात अभ्यास अहवाल गटाला काम सोपविले आहे. या दरम्यान पहिल्या टप्प्यात वर्षाला २ कोटी प्रवासी हाताळण्याची क्षमता असलेल्या या विमानतळाची क्षमता २०३२ पर्यंत वर्षाला ९ कोटी प्रवाशांपर्यंत वाढवण्याचे नियोजन आहे. त्या वेळी येथे एकूण चार टर्मिनल्स कार्यरत असतील.

# लोखंडी पट्टीवरून दुचाकी घसरून मुलगी जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरील लोखंडी पट्टीवरून दुचाकी घसरल्याने झालेल्या अपघातात दोन वर्षीय मुलगी जखमी झाली. येथील लोखंडी पट्टी क्रॉस करताना अनेक दुचाकी घसरतात. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

जैन कुटुंबीय दुचाकीवरून पनवेलच्या दिशेने येत होते. १९ एप्रिल रोजी रात्री आठच्या सुमारास ते जेवणासाठी पनवेल येथे येत असताना नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरील लोखंडी क्रॉसिंग पट्टीवरून त्यांची दुचाकी स्लिप झाली आणि ते सर्वजण खाली पडले. यात त्यांच्या दोन वर्षीय मुलीला गंभीर दुखापत झाली. तातडीने मुलीला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तीच्यावर उपचार करून तिला सोडण्यात आले. मात्र या ठिकाणी लोखंडी पट्टी क्रॉस करताना अनेकदा अपघात झालेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये लिव्हर क्लिनिकचा शुभारंभ

**पनवेल : वार्ताहर**

फॅटी लिव्हर, हिपॅटायटीस तसेच मद्यपानामुळे यकृताचे होणारे नुकसान आणि मेटाबॉलिक लिव्हर डिसऑर्डर यांसारख्या लिव्हरशी संबंधित आजारांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटलने पुढाकार घेत नवी मुंबईत लिव्हर क्लिनिक सुरू केले आहे. या क्लिनिकद्वारे लिव्हर आजारांचे वेळीच निदान, उपचार आणि दीर्घकालीन व्यवस्थापनासाठी स्क्रिनिंग व निदान सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




हे लिव्हर क्लिनिक यकृताच्या आरोग्याच्या तपासणीसाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन प्रदान करते. यकृताच्या गंभीर विकारांचा धोका असलेले रुग्ण ओळखून त्यांची वेळोवेळी तपासणी, सविस्तर वैद्यकीय मूल्यांकन आणि प्रगत निदान चाचण्या केल्या जातात. या क्लिनिकमध्ये आधुनिक उपचार पद्धतींद्वारे यकृताचे आजार सुरुवातीच्या टप्प्यात ओळखून त्याची भविष्यातील गुंतागुंत रोखण्यावर भर दिला जातो. विशेषतः मधुमेह, लठ्ठपणा, हायपोथायरॉईडीझम, मद्यपान, हिपॅटायटीस बी किंवा सी संसर्ग, तसेच कुटुंबात यकृतासंबंधी आजारांचा वैद्यकीय इतिहास असलेले आणि ऑटोइम्यून लिव्हर डिसीज असलेल्या व्यक्तींनी या स्क्रिनिंगचा लाभ घ्यावा. उच्च जोखमीच्या रुग्णांमध्ये प्रतिबंधात्मक उपायांवरही याठिकाणी भर दिला जाईल.

या क्लिनिकमध्ये लिव्हरच्या तपासणीसाठी फायब्रोस्कॅन, लिव्हर फंक्शन टेस्ट (LFT), कंप्लीट ब्लड काउंट (CBC), ट्रिपल मार्कर टेस्ट आणि निवडक रुग्णांसाठी अल्ट्रासाऊंड ॲब्डोमेन सारख्या चाचण्या केल्या जातात.

# मारहाण केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एका कारने दुसऱ्या कारला धडक दिल्याने पाच जणांनी हाताबुयाने आणि बांबूने मारहाण आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात २० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

२० एप्रिल रोजी रात्री बाराच्या सुमारास कर्मवीर भाऊराव पाटील चौक, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ मारुती वॅगन आर कार (एमएच ४६ बीयु ६९४) हिला मारुती एर्टिगा कार (एमएच ४६ डीए ६२२२) वरील चालकाने भरधाव वेगाने येऊन वाहनाचे नुकसान केले. या कारणावरून सोमनाथ तुकाराम इचके, दीपक मोरे, स्वप्नील भांगे, अमोल तुकाराम कवधरे, शिवाजी आहेरकर यांनी फिर्यादी दादा हयात गौसमूद्दीन मनियार (राहणार अजिवली) याला पाठीवर, हातावर, डोक्यात मारहाण करून दुखापत केली तसेच त्याला वाचवण्यासाठी आलेले मोहसीन मिस्त्री, उजल्फा अन्सारी, रसूल शेख, सदाम खान यांना देखील बांबू आणि हाताबूक्याने मारहाण करून शिवीगाळ केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# स्वच्छता अधिकारी व निरीक्षकांची क्षमतावृध्दी कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशातील स्वच्छ शहरांच्या नियमित क्रमवारीपेक्षा उच्च स्थानावरील ‘सुपर स्वच्छ लीग’ या विशेष कॅटेगरीमध्ये देशातील चार सर्वोत्तम स्वच्छ शहरात नवी मुंबईचा समावेश असून हे मानांकन कायम राखण्यासाठी तसेच स्वच्छतेमधील गुणवत्ता उंचाविण्यासाठी स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक, उप स्वच्छता निरीक्षक यांची विशेष क्षमतावृध्दी कार्यशाळा नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झाली.



यावेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी ‘सुपर स्वच्छ लीग’ मध्ये समाविष्ट ‘सुपर स्वच्छ शहर’ म्हणून आपल्याला ८५ टक्के पेक्षा अधिक गुणांकन मिळवायचेच आहे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने सिटी प्रोफाईल भागांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. कचऱ्याचे निर्मितीच्या ठिकाणीच ओला, सुका, घरगुती घातक अशा ३ प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण हा सर्वाधिक महत्वाचा भाग असून त्याचे प्रमाण वाढविण्यावर भर देण्यासाठी अधिक कृतीशील व्हावे तसेच सार्वजनिक ठिकाणी रस्त्यांवर लावलेल्या लिटर बिन्सची दुरूस्ती आणि त्यामधील कचरा नियमित उचलला जाण्याकडे काटेकोर लक्ष देण्याचे त्यांनी निर्देशित केले.

स्वच्छ शहराचे मानांकन मिरवताना ते टिकविण्याची जबाबदारीही आपलीच आहे हे लक्षात घेत नागरिकांचा सहभाग आणि प्रतिसाद वाढविण्यासाठी नगरसेवकांचे संपूर्ण सहकार्य घ्यावे असे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी सूचित केले. वाशीगावातून ‘सुगंधी अंगण अभियाना’ला सुरूवात झालेली असून त्याठिकाणी मिळालेला नागरिकांचा उत्साही प्रतिसाद पाहता या अभियानाची व्याप्ती शहरात इतरही भागात वाढवावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

शहरातील मुख्य रस्ते, जागा यावर लक्ष देण्यासोबतच दुर्लक्षित जागांवरील स्वच्छतेकडेही लक्ष देऊन त्यांची स्वच्छता व सुशोभिकरण यापुढील काळात हाती घेऊया असे ते म्हणाले. शौचालयांची देखभाल, दुरूस्ती व स्वच्छता सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागामार्फत पाहिली जात असून त्याकडेही स्वच्छता अधिकारी व निरीक्षकांनी लक्ष द्यावे अशा सूचना देण्यात आल्या.

साफसफाई करताना ती केलेल्या कामातून प्रदर्शित झाली पाहीजे असे सांगत प्रत्यक्ष दर्शनी स्वच्छतेवर भर देण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. त्याचप्रमाणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबविण्यासाठीही अधिक प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सध्या उन्हाळा कडक असून सफाईकर्मींच्या आरोग्याची काळजी घ्यावी, त्यांच्याकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी असेही निर्देश देण्यात आले. सद्यस्थितीत पावसाळापूर्व नाले व गटारे सफाई सुरू असून त्यांच्या सफाईतून निघणारा गाळ काठावर जरा सुकला की लगेच उचलून नेण्याचे कार्यनियोजन करावे आणि त्याची तत्पर अंमलबजावणी करावी असेही सूचित करण्यात आले.

‘स्वच्छ भारत मिशन’च्या वतीने प्रत्येक मानांकित शहराला ‘स्वच्छ शहर जोडी’ उपक्रमांतर्गत ५ शहरे जोडून देण्यात आली असून त्या अंतर्गत सर्वोत्तम स्वच्छ शहरांनी या ५ लहान शहरांना स्वच्छतेतील गुणवत्ता वाढविण्याविषयी मार्गदर्शन करावयाचे आहे. यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेकडे कन्नड, जिंतूर, केज या ३ नगरपंचायती आणि लोणार व मलकापूर या २ नगरपरिषदांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रांतील स्वच्छतेप्रमाणेच स्वच्छ शहर जोडीमधील ५ शहरांतील स्वच्छता गुणवत्तावाढीकडेही लक्ष देण्याची गरज अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी लक्षात आणून दिली.

स्वच्छ सर्वेक्षणातील सिटी प्रोफाईल भागांकडे विशेष लक्ष देतानाच गावठाणे व झोपडपट्टी भागातील स्वच्छतेकडेही नवीन संकल्पना उपयोगात आणून कार्यवाही सुरू करावी असे अतिरिक्त आयुक्तांनी सांगितले. स्वच्छता करणे हे आपले कर्तव्य आहेच मात्र ते नागरिकांचे सहकार्य आणि सक्रिय सहभाग याशिवाय यशस्वी होणे शक्य नाही त्यामुळे महापौर, उपमहापौर, सर्व पदाधिकारी, नगरसेवक यांच्या सक्रिय सहयोगातून व्यापक जनजागृतीवर भर द्यावा असेही अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी सूचित केले.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या क्षमतावृध्दी कार्यशाळेच्या माध्यमातून स्वच्छता अधिकारी व निरीक्षक, उपनिरीक्षक यांना स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत करावयाच्या कामांची निश्चित दिशा मिळेल असा विश्वास घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर व राजुसिंह चव्हाण यांनीही मनोगते व्यक्त केली.

# नवी मुंबई येथे आज महिला जनसुनावणी

## राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

‘राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी’ या उपक्रमांतर्गत महिला तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी २१ एप्रिल २०२६ रोजी नवी मुंबई येथे महिला जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. या जनसुनावणीस राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. श्रीमती विजया रहाटकर अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या नियोजनानुसार २० एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे पोलीस महासंचालक (DGP) व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात येणार आहे. तसेच २१ एप्रिल २०२६ रोजी ‘राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी’ या उपक्रमांतर्गत महिला जनसुनावणी आयोजित करण्यात येणार असून, या जनसुनावणीमध्ये महिलांच्या प्रलंबित तक्रारी तसेच प्रत्यक्ष (Walk-in) तक्रारींची सुनावणी करण्यात येणार आहे.

ही जनसुनावणी नवी मुंबई येथील सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, ९ वा मजला येथे आयोजित करण्यात येणार असून, सकाळी १० वाजल्यापासून प्राथमिक सुनावणी आणि दुपारी १२ वाजता मुख्य सुनावणी करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावरील विविध अधिकारी, पोलीस अधिकारी, समाजकल्याण विभाग, महिला व बाल विकास विभाग तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA) यांचे प्रतिनिधी या सुनावणीस उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक त्या सर्व तयारीचे नियोजन केले असून, महिला तक्रारदारांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

# नवी मुंबईत उद्या १२ तास पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा योजनेवरील महत्त्वाच्या दुरुस्ती व जोडणी कामांमुळे बुधवार, २२ एप्रिल २०२६ रोजी शहरातील अनेक भागांमध्ये १२ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

सीबीडी सेक्टर-२८ पंप हाऊस येथे मॅनिफोल्ड व व्हॉल्व बसविणे, तसेच कळंबोली सर्कल ते नेरूळ सेक्टर-१९ वंडरपार्क परिसरातील जलवाहिनीवरील व्हॉल्व बसविण्याची कामे हाती घेण्यात येणार आहेत. याशिवाय घणसोली सेक्टर-२ येथील १०० मि.मी. व्यासाच्या पाईपलाईन जोडणीचे कामही करण्यात येणार आहे.

या कामांमुळे बुधवार, २२ एप्रिल रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत मुख्य जलवाहिन्यांवरील पाणीपुरवठा बंद राहील. परिणामी बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली आणि ऐरोली या नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विभागांमध्ये पाणीपुरवठा खंडित राहणार आहे. तसेच सिडको क्षेत्रातील खारघर व कामोठे नोडमध्येही पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे.

बुधवारी संध्याकाळचा पाणीपुरवठा होणार नाही, तर गुरुवार, २३ एप्रिल रोजी सकाळ व संध्याकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# हापूस आंब्याची हंगामातील विक्रमी आवक


## मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तब्बल ९४ हजार पेट्या दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अक्षय्य तृतीयेच्या पूर्वसंध्येला मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) फळ बाजारात हापूस आंब्याची यंदाच्या हंगामातील विक्रमी आवक नोंदवण्यात आली आहे. शनिवारी (दि.१८) एकाच दिवशी तब्बल ९४ हजार ६ पेट्यांची आवक झाली असून, सणासुदीच्या पार्श्वभूमीवर बाजारात मोठी उलाढाल अपेक्षित आहे.

या आवकेत महाराष्ट्रातील कोकण पट्ट्याचा मोठा वाटा असून ५८ हजार ८९४ पेट्या रत्नागिरी, देवगड, सिंधुदुर्ग या भागांतून दाखल झाल्या आहेत. तर इतर राज्यांतून ३५ हजार ११२ पेट्यांची आवक झाली आहे. यंदा कोकणात अवकाळी पाऊस, बदलते हवामान आणि कीडरोगांचा फटका बसल्याने उत्पादनात मोठी घट झाली होती. त्यामुळे हंगामाच्या सुरुवातीला आवक मर्यादित राहून दर उच्च पातळीवर होते.

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून आवक वाढू लागली असून, अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर ती उच्चांकावर पोहोचली आहे. आठवड्याच्या सुरुवातीला ४० ते ५० हजार पेट्यांपर्यंत असलेली आंब्याची आवक शनिवारी जवळपास दुपटीने वाढली. या वाढलेल्या पुरवठ्याचा परिणाम दरांवर झाला असून, घाऊक बाजारात



हापूस आंब्याचे दर काही प्रमाणात घसरले आहेत. सध्या दर्जानुसार प्रति पेटी (५ डझन) सुमारे १५०० ते ४००० रुपये दर मिळत आहेत.

सणानिमित्त भेटवस्तू म्हणून हापूसची मागणी कायम असल्याने उच्च प्रतीच्या आंब्यांना तुलनेने चांगले दर मिळत आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, एप्रिल-मे हा हापूसचा मुख्य हंगाम असल्याने पुढील काही दिवसांत आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. रविवारी अक्षय्य तृतीया असल्यामुळे बाजारात खरेदीचा जोर कायम राहील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. आवक आणि मागणी यामधील संतुलन लक्षात घेता दरात आणखी काही प्रमाणात चढ-उतार होऊ शकतो, असे मत मुंबई एपीएमसीतील आंबा व्यापारी संजय पानसरे यांनी व्यक्त केले आहे.

अक्षय्य तृतीया हा सण हिंदू परंपरेत अत्यंत शुभ मानला जातो. या दिवशी कोणतीही नवी खरेदी, गुंतवणूक किंवा शुभकार्य केल्यास त्यात सातत्याने वाढ होते, अशी श्रद्धा आहे. त्यामुळेच या दिवशी सोने-चांदीप्रमाणेच हंगामी फळांनाही विशेष महत्त्व असते.

हापूस आंबा हा उन्हाळ्यातील प्रमुख आणि प्रतिष्ठेचे फळ मानला जातो. अक्षय्य तृतीयेच्या सुमारास त्याचा हंगाम बहरात येत असल्याने या दिवशी आंब्याची खरेदी करण्याची प्रथा अनेक ठिकाणी आहे. कुटुंबीयांना, नातेवाईकांना किंवा व्यावसायिक संपर्कांना भेटवस्तू म्हणून हापूस देण्याची परंपराही रूढ झाली आहे.

याशिवाय आंबा हे समृद्धी, गोडवा आणि भरभराटीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी आंब्याची खरेदी व सेवन केल्यास वर्षभर सुख-समृद्धी लाभते, अशी लोकांची धारणा आहे. म्हणूनच या सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारात हापूस आंब्याला विशेष मागणी दिसून येते.

# सोनखार ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंचपदी भाजपच्या माधुरी पाटील

**पेण : प्रतिनिधी**

सोनखार ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंचपदी माधुरी प्रशांत पाटील (उर्णोली) यांची बिनविरोध निवड झाली असून यावेळी भाजप ज्येष्ठ नेते हरिश्चंद्र डंगर, कृष्णा ठाकूर, लेखक अनंत पाटील, प्रशांत पाटील, माजी उपसरपंच भालचंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच ऋतिका पाटील, माजी उपसरपंच रमेश पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

मागील काळात 5 वर्ष सरपंच म्हणून काम पाहताना त्यांनी लोकहिताचे निर्णय घेऊन ग्रामस्थांमध्ये एक विश्वासाचे नाते निर्माण करण्याचे काम केले. यामुळे जनतेने त्यांना पुन्हा संधी देऊन सोनखार ग्रुप ग्रामपंचायतीवर सदस्य म्हणून निवड दिले.



यावेळी उपसरपंच यांनी राजीनामा दिल्याने माधुरी प्रशांत पाटील यांनी उपसरपंच पदासाठी आपला अर्ज पीठासन अधिकारी तथा ग्रामसेवक नीलिमा जुईकर यांच्याकडे दाखल केला. यावेळी दुसरा कोणताही अर्ज न आल्याने पीठासन अधिकारी यांनी माधुरी प्रशांत पाटील यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. यावेळी निकटवर्तीय व ग्रामस्थ यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांनी आमदार रविशेठ पाटील व जि प. आरोग्य सभापती वैकुंठ पाटील यांची भेट घेतली या वेळी दोन्ही नेत्यांनी माधुरी पाटील यांचे अभिनंदन केले.

# घरफोडी करणारा आरोपी गजाआड; गुन्हे अन्वेषण विभागाची कारवाई

**खोपोली, अलिबाग, मोहोपाडा : प्रतिनिधी**

ऑनलाईन रमी खेळात मोठ्या प्रमाणात पैसे गमावल्यानंतर कर्ज फेडण्यासाठी घरफोड्या करणाऱ्या एका तरुणाचा रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने पर्दाफाश केला आहे. या आरोपीकडून तब्बल पाच घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

नागोठणे पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू होता. तपासादरम्यान पोलिस हवालदार अमोल हंबीर व पोलीस शिपाई ईश्वर लांबोटे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. त्यानंतर संशयित आरोपी आदित्य अमृत कुथे याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने ऑनलाईन रमीमध्ये मोठे नुकसान झाल्यामुळे आर्थिक कर्ज फेडण्यासाठी घरफोड्या केल्याची कबुली दिली.

आदित्य अमृत कुथे (वय 23, रा. शिहू-मुंढाणी, ता. पेण जि.रायगड) याच्याकडून नागोठणे पोलीस ठाण्यातील एकूण पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कारवाई रायगड जिल्हा



पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# जांभूळ परिसरात भीषण अपघात

## दुचाकीचालक ठार, पत्नी गंभीर जखमी

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा ते श्रीवर्धन मार्गावर शनिवारी ( दि. १८ एप्रिल) मोजे जांभूळ गावाच्या हद्दीत भीषण अपघात घडून एकाचा जागीच मृत्यू झाला असून दुचाकी स्वार पत्नी गंभीर जखमी झाली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नरेश जनार्दन पाटील आपल्या पत्नीसह पल्सर दुचाकीवरून आरावी (श्रीवर्धन)कडे जात होते. र मोटारसायकलवरील ताबा सुटल्याने वाहन रस्त्यालगतच्या आंब्याच्या झाडावर जोरात आदळले.या भीषण घटनेत नरेश पाटील व त्यांच्या पत्नी गंभीर जखमी झाली. म्हसळा येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असता डॉ. कर्ण यांनी तपासणीअंती नरेश पटील यांना मृत घोषित केले.

## पनवेल महानगरपालिका,

ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

जा.क्र. पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०४/१३७/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/०४/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना पुरवणी कार्यसूची**

प्रति,
मा. श्री. /श्रीमती.
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/ महोदया,
पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार, दिनांक २४/०४/२०२६** रोजी सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०४ दिनांक २४/०४/२०२६ ची पुरवणी कार्यसूची विषयपत्रिका**

**३. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**
(मुळ विषयपत्रिकेत अ. क्र. १ ते १३ विषय समाविष्ट आहेत.)

१४. लोकमान्य नगर, मालधक्का येथील भूखंड क्र. ३८९ (पनवेल) येथील झोपडपट्टी धारकांच्या पुर्नवसनाबाबत.

१५. पनवेल महानगरपालिका मालकीची वाहने व जनरेटरकरीता इंधन भरणेकामी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजित खर्च रक्कम रु. ३,९६,००,०००/- मात्रास मान्यता मिळणेबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

महापालिका भवन, पनवेल
सोबत - विषयाचा गोषवारा.
जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.११३/१२४/२०२६
दिनांक :- २०/०४/२०२६

**सही/-**
**नामासाहेब कामठे**
महापालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

## महावितरण — सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालया अंतर्गत सूरव तर्फे तळे, चीरवली, आमडोशी, पेण तर्फे तळे, बोरघर, उसर व भांनग या गावातील व परिसरातील नागरिकांना सूचित करण्यात येत कि तळा उपविभाग अंतर्गत असणारे २२ के व्ही तळा बोरघर स्विचिंग ते नाईटने स्विचिंग स्टेशन माणगाव उपविभागा अंतर्गत येणारी २२ के व्ही मोर्बा उपरी तार उच्च दाब वाहिनी (२२ के व्ही ) उद्या दि. २१.०४.२०२६ रोजी सकाळी ०८.०० वाजता कार्यान्वित करण्यात येत आहे तरी सदर लाईनच्या पोल ला तसेच तणावाला कोणीही स्पर्श करू नये, तसेच पोल ला व तणावाला गुरे बांधू नये तसेच वीज वाहिनीच्या वीज वाहक तारांजवळील झाडाच्या फांद्या महावितरणच्या परवानगी शिवाय तोडू नये. तसेच सदर वीज वाहिनीच्या खाली कुठल्याही शेत मालाची साठवणूक करू नये.

PRO NO. 046 — **कार्यकारी अभियंता, रोहा विभाग**

## रोहा अष्टमी नगर परिषद

**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.**
फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५७३७
Email : rohanagarpalika@gmail.com

**जाहीर ई-निविदा सूचना**

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २१/०४/२०२६ रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक २९/०४/२०२६ रोजीपर्यंत राहील.

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
नगराध्यक्षा
रोहा अष्टमी नगर परिषद

क्र. रोनप/बांवि/ई- निविदा सूचना/२५२/२०२६
दिनांक- २०/०४/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांची विद्यमान मालक श्री. किरण चंद्रकांत ठक्कर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक श्री. किरण चंद्रकांत ठक्कर यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे संगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे - जुई (५५३३३० ),
ULPIN : ३०३३८०१५८८५, ता. उरण जि. रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १४१ / १ खाते क्रमांक २२९६ | १ | ०.४४.८० पो.ख ०.०३.५० | २.३१ |
| | | एकूण क्षेत्र ०.४८.३० | |

**या एकूण क्षेत्राची विक्री ०.४८.३० गुंठे**

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार मिळकत, विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा,पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क - हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून १४ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१ एप्रिल २०२६

**सही**
**ॲड. निलेश झंजाड**

बी १०४ सफायर, सी. एच. एस. लि., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे - ता.पनवेल, जि. रायगड
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे नेरेपाडा, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| | | क्षेत्र | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| भुमापन नं. / हि. नं. | १२८ | ०-८२-७० हे.आर.चौ.मी. | १०.९४ | निर्मला गुरुनाथ पाटील, प्रमिला अंकुश फडके, मालती गणपत मढवी, संगिता अनंत खुटले |
| भूखंड नं. | TPS-III Plot No. २०७ | ३३०९ चौ.मी. | | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २०/०४/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक मोईज सैफुद्दीन राजकोटवाला रा. ४०७ बी, राजमंदिर, यारी रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००६१ यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णनः**
**मौजे - डोलघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६० | ५ | ०-११-०० पो.ख. ०-०३-०० | ०.३१ |
| ६१ | १२ | ०-०८-२० पो.ख. ०-००-५० | ०.२८ |
| ६१ | ५ | ०-१७-३० पो.ख. ०-०१-५० | १.२४ |
| ६३ | १० | ०-०१-५० पो.ख. ०-००-०० | ०.०३ |
| ६३ | २ | ०-७६-०० पो.ख. ०-००-०० | ०.१६ |
| ६४ | ४ | ०-०३-५० पो.ख. ०-००-०० | ०.२२ |
| ७० | ११ | ०-१७-०० पो.ख. ०-०४-०० | ०.३१ |
| ७० | २ | ०-२४-०० पो.ख. ०-००-०० | ०.६२ |
| ७० | ४ | ०-२९-०० पो.ख. ०-२७ -०० | ०.५३ |
| ७६ | ६ | ०-८८-०० पो.ख. ०-३०-०० | १.६२ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल
दिनांक : २०/०४/२०२६

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
ॲडव्होकेट

पत्ता : शॉप नं. १३०, मुन्सिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल. ता. पनवेल, जि.रायगड-४१० २०६.
मो.नं. ८१०८५५८२८९

## जाहीर नोटीस

**तहसिलदार खालापुर जि. रायगड यांचे न्यायालयात**

क्र.मशा/हक्कनोंद/कात-४/५२१२/विठ्ठल कदम/२०२५, दिनांक ०४/०९/२०२५

प्रति,
१. श्री.विठ्ठल नारायणराव कदम,
२. श्री. शिवराम जयसिंगराव कदम,
रा.वावंढळ ता. खालापुर जि. रायगड — **अर्जदार**

**विरुद्ध**

१. श्री. निलेश यशवंतराव कदम,
२. श्री. प्रसाद मनोहर कदम,
३. श्री. अर्जुन बळीराम कदम,
४. श्री. सदानंद पांडुरंगराव कदम,
५. श्री. आत्माराम बाबाजीराव कदम,
६. श्री. परशुराम सखारामराव कदम,
७. श्री. किशोर बाबुराव कदम,
८. ग्रामस्थ मंडळ वावंढळ,
सर्व रा.वावंढळ ता.खालापुर जि. रायगड — **सामनेवाले**

अर्जदार व सामनेवाला यांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वावंढळ ता.खालापुर येथील स.नं १६/२, क्षेत्र ०-४०-५० हे.आर, स.नं १७/१७ क्षेत्र ०-६४-०० हे.आर, स.नं ६/१/२/३/४/पै क्षेत्र ०-९९-०० हे. आर या जमिन मिळकतीच्या कब्जेदार सदरी दाखल असलेले श्री. विठ्ठल नारायणराव कदम, श्री. शिवराम जयसिंगराव कदम हे नाव कमी करुन सामनेवाले हे नवीन सदस्य यांचे नावे दाखल करुन मिळणेकामी अर्जदार यांनी या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

तरी सदर जमिन मिळकतीबाबत ग्रामस्त मंडळ वांवढळ व इतर कोणत्याही हित संबंधित व्यक्ती यांना हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तहसिलदार खालापुर 'यांचे न्यायालयात ३० दिवसांच्या आत समक्ष हजर राहुन हरकत घ्यावयाची आहे.

या द्वारे असे जाहिर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे न्यायालय अर्जदार यांचे अर्जानुसार गाव दप्तरी मौजे वावंढळ ता. खालापुर येथील स.नं १६/२, क्षेत्र ०-४०-५० हे.आर, स.नं १७/१७ क्षेत्र ०-६४-०० हे. आर, स.नं ६/१/२/३/४/पै क्षेत्र ०-९९-०० हे.आर या जमिन मिळकतीच्या कब्जेदार सदरी दाखल असलेले श्री. विठ्ठल नारायणराव कदम, श्री.शिवराम जयसिंगराव कदम हे नाव कमी करुन सामनेवाले नवीन सदस्य यांचे नावे दाखल करणेकामी नियमोचित कार्यवाही करणेत येईल यांची सर्वांनी नोंद घेण्यात यावी.

आज दिनांक १७/०४/२०२६ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली असे.

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
तहसिलदार खालापुर

(General Form)
(Sch. 1 App. Form-4)
Shri. C. B. Kore Advocate

## Publication Notice

**IN THE COURT OF THE MEMBER, MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL, KOLHAPUR, AT KOLHAPUR.**
[R.V.Utpat Sabeb]

MAC.No. 243/2021
EXH.No. 26/D.

1] Shri. Avinash Deepak Ghatage
Age: 35 yrs, Occu: Cleaner.
R/o. Shintre Colony, Near Nila Shetti Hospital, Nippani, Dist: Belgaum Karnataka State
At/p.: Yadavwadi, Shiroli Pulachi,
Tal: Hatkanangale, Dist: Kolhapur. — Applicant

**V/s.**

3] Shri. Aniket Ambadas Parde
Age: 25 years, Occu: Driver,
R/o. At-Shirse, Post-Kondiwade,
Tal: Karjat, Dist: Raigad-410201.
**(Driver of Traveler Bus No.GA-07-F-7077)** — **Opponent**

To
Opponents No.3

Whereas the above named Petitioner/s has made an application to this Court us 166 of Motor Vehicle Act 1988 for **Rs.5,46,000/-**

You are hereby warned to appear in this court in person or by a Pleader duly instructed on the **date on 29/06/2026 at 10.30 a.m.** in the forenoon, to show cause against the said application failing in wherein, the said application will be heard and determined ex-party.

If you are intend to file written statement you must file it within 30 days or in extended period U/0.8 rule 1 of C. P. C.

Also take notice in default of your filing on address for service on or before the date mentioned, you are liable to have defense struck out.

If you have insufficient funds to meet out the court expenses and your income is not more than Rs. 20,000/- per year, and you want to defend through an Advocate or legal practitioner, you can do so through the Legal Aid committee, which is at your district or Taluka place.

Given under my hand and the seal of the Tribunal this day of. 16.04.2026.

Sd/- Jr. Clerk — Court Seal — By Order, Sd/- Supdt. Dist. Court, Kolhapur.

पान ५ वरुन

**Schedule-IV**

**Summary of Social Impact Assessment:-** Mouje-Dharnacamp, Pisarve and Turbhe within Panvel Municipal Corporation limits, total area 5.2052 sq.m. Mouje-Dharnacamp, from S.No.1 in Tal. Panvel to Mouje-Turbhe, S.No.83 in Tal. Panvel, Ambernath- Kulgaon Badlapur and the area is required to acquire the land of the plot affected by the road which has been changed in the width of 30.00 m as shown in the notified development plan. Only 35 account holders are being affected by the acquisition of these lands and the account holders are not being displaced. Industrial area of Panvel city Since the proposed area is of great importance and urbanization as well as development and expansion is taking place at a rapid pace, the society will not be able to progress without acquiring it. Therefore, it is necessary to widen the road for public traffic. Therefore, there is no need for a social impact assessment study as per the provisions of Sections 9 and 40 of the Land Acquisition Act, 2013 in the public interest.This land acquisition process should begin as soon as possible.

Note:- The plan of the said land can be inspected at the office of the Sub-Divisional Officer, Panvel Sub-Division.

Place: Panvel
Date: 13/04/2026

**Sd/-**
**(Pavan Chandak)**
Sub Divisional Officer Panvel
Sub Division Panvel

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/१३/५२६/२०२६

# कोलकाताचा अखेर पहिला विजय

## राजस्थानला नमविले; रिंकू सिंहची अर्धशतकी खेळी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्स संघाने आपल्या पहिल्या विजयाची नोंद केली आहे. ईडन गार्डनवर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाचा चार विकेटने पराभव केला. रिंकू सिंह याने नाबाद ५३ धावांची खेळी करत सामना जिंकवून दिला.



राजस्थान संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये १५५-९ धावा केल्या होत्या. राजस्थानकडून वैभव सूर्यवंशी याने सर्वाधिक ४६ धावांची खेळी केली, तर यशस्वी जयस्वालने ३९ धावा केलेल्या. इतर फलंदाजांना काही खास कामगिरी करता आली नाही. या धावांचा पाठलाग करताना केकेआर संघ हा सामना गमावतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती, मात्र केकेआरकडून रिंकू सिंह आणि अनुकूल रॉय यांनी ३७ चेंडूत ७६ धावांची भागीदारी करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. प्रारंभी यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी ८१ धावांची सलामी दिली. दोघांनीही केकेआरच्या गोलंदाजांवर आक्रमण चढवले होते. त्यामुळे राजस्थान केकेआरला २०० नावांच्या आसपास लक्ष्य देईल असे वाटत होते, मात्र केकेआरच्या फिरकीपटूंनी आपली जादू दाखवली.

वरूण चक्रवर्ती तीन विकेट, कार्तिक त्यागी तीन विकेट आणि सुनील नरेन याने दोन विकेट घेतल्या होत्या. केकेआरला फक्त १५६ धावा जिंकण्यासाठी गरजेच्या होत्या, मात्र राजस्थानच्या गोलंदाजांनी संपूर्ण सामन्यात वर्चस्व ठेवले होते. केकेआरचा संघ दबावत होता. त्यामुळे त्यांच्या काही अंतरावरच विकेट पडल्या, परिणामी शेवटपर्यंत केकेआर दबावतच खेळत होती, परंतु रिंकू सिंहने शेवटपर्यंत मैदानावर टिकून राहत एक बाजू लावून धरली. राजस्थानने केकेआरला पहिल्याच बॉलर मोठा झटका दिला.

जोफ्रा आर्चर याने पहिल्याच बॉलवर सायफर्ट याला बोल्ड केले. त्यामुळे सुरुवातीपासूनच केकेआर दबावत होती. रहाणेसुद्धा शून्यावर आऊट झाला. रघुवंशी १० धावा, कॅमेरून ग्रीन २७ धावा, रोवमन पॉवेल २३ धावा, रिंकू सिंह नाबाद ५३ धावा, रमणदीप सिंग १० धावा आणि अनुकूल रॉय नाबाद २९ धावा केल्या. अनुकूल रॉय आणि रिंकू सिंह मैदानावर टिकले नसते, तर केकेआरसाठी हा सामना जिंकणे कठीण होते, मात्र दोघांनी संयम दाखवला आणि योग्य वेळी आक्रमक फलंदाजी करत सामना खेचला. हा विजय केकेआरसाठी खूप महत्त्वाचा होता.

# द. आफ्रिकेच्या महिला संघाचा सलग दुसरा विजय

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

वनडे वर्ल्डकप विजेत्या वूमन्स टीम इंडियाने दक्षिण आफ्रिका दौऱ्यात टी-२० मालिकेतील सलग दुसऱ्या सामन्यातही निराशा केली आहे. यजमान दक्षिण आफ्रिकेने सलग दुसरा विजय मिळवत पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी एकतर्फी आघाडी मिळवली. दक्षिण आफ्रिकेने या विजयासह मालिका विजयाचा दावा आणखी मजबूत केला आहे.

टीम इंडियाने लेडी सेहवाग अर्थात शफाली वर्मा हीच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेसमोर १४८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. दक्षिण आफ्रिकेने हे आव्हान हे अवघ्या दोन विकेट्सच्या मोबदल्यात १७ बॉलआधी पूर्ण केलं. दक्षिण आफ्रिकेने १७.१ ओव्हरमध्ये १४८ रन्स करत विजय नोंदवला. दक्षिण आफ्रिकेने टॉस जिंकून पाहुण्या टीम इंडियाला बॅटिंगसाठी बोलावलं. टीम इंडियाला संपूर्ण २० ओव्हर खेळल्यानंतरही १५० धावाही करता आल्या नाहीत. दक्षिण आफ्रिकेने टीम इंडियाला डावातील शेवटच्या चेंडूवर १४७ रन्सवर ऑलआऊट केलं. टीम इंडियासाठी शफाली वर्मा व्यतिरिक्त डेब्युटंट अनुष्का शर्मा हिने सन्मानजनक



धावा केल्या, तर इतरांनी दक्षिण आफ्रिकेसमोर गुडघे टेकले.

शफालीने ३८ बॉलमध्ये दोन सिक्स आणि सात फोरसह ५७ रन्स केल्या, तर अनुष्काने ३१ चेंडूत २८ धावा केल्या. त्याव्यरिक्त कुणालाही २० हा आकडा गाठता आला नाही. दक्षिण आफ्रिकेसाठी दोघींनी प्रत्येकी तीन विकेट्स मिळवल्या. तर इतर दोघींनी प्रत्येकी एक विकेट घेत टीम इंडियाला ऑलआऊट करण्यात योगदान दिलं. दक्षिण आफ्रिकेची विजयी धावांचा पाठलाग करताना अप्रतिम सुरुवात झाली. कॅप्टन लॉरा वॉल्वार्ड आणि सुने लुस या सलामी जोडीने शतकी भागीदारी करत दक्षिण आफ्रिकेचा विजय निश्चित केला.

# ...अन् रिकी पाँटिंग भडकला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रियांश आर्य आणि कूपर कोनोलीच्या आक्रमक अर्धशतकाच्या जोरावर पंजाब किंग्ज संघाने आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत लखनऊ सुपर जायंट्स संघावर ५४ धावांनी मात केली. या विजयासह पंजाबने गुणतयातील अव्वल क्रमांक आणखी भक्कम केला. या सामन्यामध्य एक किस्सा घडला, तो म्हणजे सामन्याच्या १८ ओव्हरमध्ये असं काही घडलं की कोच रिकी पाँटिंग भडकलेला दिसला.

सामन्याच्या १८ ओव्हरमध्ये अर्शदीप बॉलिंग करत होता, त्यावेळी लखनऊचा मार्करम खेळत होता. सामना पंजाबच्या बाजूनेच झुकलेला होता. त्यावेळी मार्करम मोठे फटके खेळण्याचा प्रयत्न करत होता. पाचव्या चेंडूवर तो मोठा फटका खेळला, चेंडू सीमारेषेच्या दिशेने जात होता. तिथे शशांक सिंह हा फील्डिंग करत होता. त्याचा अंदाज चुकला. चेंडू सीमारेषेच्या पलीकडे जात आहे असे त्याला वाटले, पण चेंडू सीमारेषेरवच पडला. हा सहज कॅच झाला असता, मात्र त्याला ताळमेळ साधता आला नाही. खराब फील्डिंगमुळे डग आऊटमध्ये बसलेले पाँटिंग भडकला. सामना संपल्यावर पाँटिंग दोघे एकत्र दिसले. त्यामुळे ही नाराजी फार काही काळ राहिली नाही.

# पंजाबची विजयी घोडदौड; लखनऊचा धुव्वा

**चंदिगड : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात रविवारी डबल हेडरमधील दुसरा सामना पार पडला. पंजाबने पहिल्यांदा फलंदाजी करताना सात बाद २५४ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना लखनऊचा संघ २० ओव्हरमध्ये २०० धावा करू शकला. या विजयासह पंजाब किंग्ज अजिंक्य असून त्यांनी पॉइंट टेबलमध्ये पहिल्या स्थानी झेप घेतली आहे. दुसरीकडे लखनऊ संघाचा हा चौथा पराभव ठरला असून पॉइंट टेबलमध्ये ते आठव्या स्थानी पोहचले आहेत.

पंजाबचा प्रभसिमरन सिंग लवकर आउट झाला. त्यानंतर प्रियांश आर्य आणि कुपर कोनोली या दोघांनी कहर केला. ८० चेंडूंमध्ये १८२ धावांची भागीदारी करत लखनऊ संघाला बॅकफूटवर ढकलले. दोघांच्या भागीदारीने पंजाब संपूर्ण सामन्यात आघाडीवर होता. दुर्दैवाने दोघांचे शतक पूर्ण झाले नाही. प्रियांशने ३७ चेंडूत ९३ धावांची दमदार खेळी केली. यामध्ये त्याने नऊ षटकार आणि चार चौकार ठोकले. दुसरीकडे कोनोली याने ४६ चेंडू ८७ धावांची खेळी. त्यानेही आठ चौकार आणि सात षटकारांची



आतषबाजी केली. या दोघांनंतर शेवटला स्टॉयनिसने १६ चेंडू २९ धावा करत संघाला २५० चा टप्पा पार करून दिला. लखनऊ संघाकडून या डोंगराएवढ्या लक्षाचा पाठलाग करण्यासाठी लखनऊकडून ओपनिंगला आयुष बदोनी आणि मिचेल मार्श उतरले होते. दोघांनीही दमदार सुरुवात केली, मात्र पॉवर प्लेच्या शेवटच्या ओव्हरमध्ये बदोनी मोठा फटका मारण्याच्या नादात आऊट झाला. त्याने ३५ धावा केल्या. त्यानंतर ऋषभ पंत आणि मार्श यांनी मोर्चा सांभाळला.

# कॅप्टन ऋषभ पंतचा एकहाती षटकार

**चंदिगड : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्सने रविवारी १९ एप्रिलला आयपीएल स्पर्धेच्या १९ व्या मोसमातील सर्वोच्च धावसंख्या उभारली. प्रियांश आर्य आणि कुपर कोनोली या दोघांनी केलेल्या वादळी खेळीच्या जोरावर पंजाबने घरच्या मैदानात लखनौ सुपर जायंट्ससमोर २५० पार मजल मारली. पंजाबने २० ओव्हरमध्ये ७ विकेट्स गमावून २५४ धावा केल्या. विजयी धावांचा पाठलाग करताना लखनौने सुपर सुरुवात केली. मिचेल मार्श आणि आयुष बडोनी या दोघांनी पावरप्लेच्या पहिल्या ६ षटकांत ६१ धावा जोडल्या. आयुषच्या रुपात लखनौने पहिली विकेट गमावली. आयुषने ३५ धावा केल्या. त्यानंतर कॅप्टन ऋषभ पंत



मैदानात आला. पंतने पहिल्याच ओव्हरमध्ये कमाल केली. पंतने मार्को यान्सेनसारख्या उंचपुऱ्या गोलंदाजांसमोर एकहाती षटकार लगावले. पंतने या ओव्हरमध्ये एकूण २ षटकार लगावले. पंतच्या या फटकेबाजीचा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# मोहोपाडा येथे रायगड जिल्हास्तरीय खुली तायक्वांदो स्पर्धा उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हास्तरीय खुली तायक्वांदो स्पर्धा २०२६ ॲमुचर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगड आणि जिल्हास्तरीय तायक्वांदो राष्ट्रवादी चषक मोहोपाडा येथील जनता विद्यालय शाळेचा सभामंडपात मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीरित्या पार पडली.

जिल्ह्यातील विविध भागांतून सहभागी झालेल्या दोनशेहून अधिक खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. अत्यंत चुरशीच्या लढतींमध्ये अटॅकर्स तायक्वांदो अकॅडमीने सर्वसाधारण विजेतेपद पटकावत आपले वर्चस्व सिद्ध केले.या स्पर्धेचे उदघाटन डॉ.पारनेरकर महाराज विद्यालयाचे अध्यक्ष तुळशीदास पाटील आणि सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी माजी सरपंच संदीप मुंढे, माजी सरपंच रोशन राऊत, उपसरपंच स्वप्निल जांभळे, माजी उपसरपंच दत्ता शिंदे, ग्रामपंचायत सदस्य केदार भोईर, संतोष मैदर्गीकर, राकेश खराडे,एकनाथ खाने, संतोष मांडे, मनोहर पाटील, ज्ञानेश्वर पाटील, वर्षाताई पाटील, विनया पाटील,



## २००हून अधिक खेळाडूंचा सहभाग

सारिका कांबळे, शारदा काळे, अर्चना मुंढे, तुषार पाटील, पांडू पारंगे, प्रमोद राहिलकर, नामदेव कोकंबे, हरेश उतेकर, विनोद शिंदे, सर्जेराव पाटील, गणेश काळे रमेश गोंधळी आदी उपस्थित होते.

या स्पर्धेंचा अंतिम निकाल पुढीलप्रमाणेः प्रथम क्रमांकः अटॅकर्स तायक्वांदो अकॅडमी, द्वितीय क्रमांकः गुरुकुल तायक्वांदो अकॅडमी, तृतीय क्रमांकः अगस्तू तायक्वांदो अकॅडमी, चतुर्थ क्रमांकः किंग फायटर क्लब (पोलीस हेडकॉटर), पाचवा क्रमांकः तायक्वांदो स्पोर्ट्स अकॅडमी

या स्पर्धेचे आयोजन तायक्वांदो संघटनेचे अध्यक्ष संदीप सुदाम मुंढे, सचिव सचिन माळी आणि खजिनदार रोहित तानाजी सिनलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. त्यांच्या प्रभावी नियोजनामुळे स्पर्धा वेळेत आणि अत्यंत शिस्तपूर्ण पद्धतीने पार पडली. खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कौशल्याला चालना देणे हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी बोलताना सांगितले.

यावेळी सांगता समारंभात जिल्हा संघटनेचे अध्यक्ष संदीप मुंढे यांच्याहस्ते विजेत्या खेळाडूंना पदके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या संघांचा विशेष सन्मान करण्यात आला.

मोहोपाडा येथील स्पर्धा खेळाडूंना उत्कृष्ट व्यासपीठ देणारी ठरली असून, भविष्यात अशा स्पर्धांमुळे जिल्ह्यातील तायक्वांदो खेळाला अधिक चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# राशिद खानचा गौप्यस्फोट

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानचा कर्णधार आणि स्टार अष्टपैलू खेळाडू राशिद खान सध्या आयपीएल खेळत आहे. गुजरात टायटन्सकडून खेळणाऱ्या राशिद खानने अशी कोणती धमाकेदार कामगिरी केलेली नाही. मात्र तरी देखील तो सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राशिद खानचे एक पुस्तक रिलीज होणार होणार आहे. या पुस्तकाचं नाव 'राशिद खान : फ्रॉम स्ट्रीट टू स्टारडम' असं आहे. या पुस्तकात त्याने भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांकडून मला काही वर्षांपूर्वी त्यांच्या देशाकडून खेळण्याची ऑफर मिळाली होती असा गौप्यस्फोट केला आहे. या पुस्तकात राशिदने एका जुन्या घटनेचा संदर्भ दिला आहे. त्यात तो बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने संपर्क करून अफगाणिस्तानमधील परिस्थितीचा हवाला देत भारतीय नागरिकत्व देण्याचा प्रस्ताव दिला असल्याचे सांगितले.

# निवड समिती अध्यक्षपदी अजित आगरकर कायम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

'बीसीसीआय'ने वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांच्या नावावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने गेल्या काही वर्षांत मिळवलेले घवघवीत यश पाहता, २०२७ च्या वन-डे विश्वचषकापर्यंत त्यांच्याकडे ही जबाबदारी कायम ठेवण्याचा निर्णय बोर्डाने घेतला. त्यांच्या कार्यकाळात भारताने चारपैकी तीन 'आयसीसी' जेतेपदे पटकावून जागतिक क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२६ या काळात आगरकर यांच्या निवड समितीने निवडलेल्या संघांनी दोन टी-२० विश्वचषक आणि एक चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकण्याचा पराक्रम केला. 'बीसीसीआय'च्या एका वरिष्ठ सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, निवडकर्ता चार वर्षांपर्यंत आपल्या पदावर राहू शकतो, त्यामुळे त्यांच्या कराराचे नूतनीकरण करण्यात आले आहे. निवड समितीच्या कामगिरीवर बोर्ड समाधानी असल्याने हा निर्णय अपेक्षितच होता.

आगरकर यांच्या कार्यकाळात निवड समितीने अनेक 'कठोर' निर्णय घेतले. यात प्रामुख्याने विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची कसोटी निवृत्ती, तसेच अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला टप्प्याटप्प्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून विश्रांती देणे यांसारख्या मोठ्या निर्णयांचा समावेश आहे. तसेच, टी-२० विश्वचषकासाठी शुभमन गिलसारख्या बड्या खेळाडूला वगळून इशान किशनला संधी देण्याचा धाडसी निर्णयही याच समितीने घेतला होता.

२०२७ चया ५० षटकांच्या विश्वचषकासाठी संघ नियोजनात सातत्य राहावे, हा 'बीसीसीआय'च्या या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. आगामी महत्त्वाच्या मालिका आणि विश्वचषकासाठी आगरकर यांच्या अनुभवाचा भारतीय संघाला मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पराभवानंतर वैभवचा रडताना व्हिडीओ व्हायरल



**कोलकाता :** कोलकता नाईट राइडर्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स यांच्यामध्ये सामना झाला या सामन्यामध्ये केकेआरच्या संघाने ६ विकेट्सने विजय मिळवला. या सामन्यामध्ये राजस्थान रॉयल्सच्या संघाची कमकुवत कामगिरी पाहायला मिळाली. आरआरच्या सलामीवीर फलंदाजांनी संघाला चांगली सुरुवात करून दिल्यानंतर दोन्ही सलामीवीर फलंदाज बाद झाले आणि संघ फलंदाजीमध्ये पूर्णपणे कोसळला. मागील काही सामन्यांमध्ये राजस्थानच्या संघाची फलंदाजी मजबूत दिसत होती पण त्यानंतर मागील दोन्ही सामन्यांमध्ये आरआरच्या संघाने खराब कामगिरीमुळे त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. आता आरआरचा युवा स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी एका व्हिडिओमध्ये पराभवानंतर रडताना दिसत आहे.

वैभव सूर्यवंशी हा मागील काही सामन्यामध्ये आयपीएल २०२६ च्या झालेल्या आरआरच्या सामन्यात त्याने कौतुकास्पद कामगिरी केली आहे. त्याने फक्त सनराइझर्स हैदराबादविरुद्ध सामन्यात तो शून्यावर बाद झाला होता. त्याव्यतिरिक्त त्याने सर्व सामन्यामध्ये संघाला चांगली सुरुवात करुन दिली आहे. केकेआरविरुद्ध सामन्यामध्येदेखील त्याने राजस्थानच्या संघाला चांगली सुरूवात करुन दिली होती, पण त्याचे त्या सामन्यामध्ये अर्धशतक हूकले होते. त्याचबरोबर कमी धावसंख्या असल्यामुळे केकेआरच्या संघाने सहज विजय मिळवला त्यानंतर यूवा वैभव सूर्यवंशी हा संघाचा पराभव झाल्यामुळे तो रडला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com